रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १९ ◆ अंक २८
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

‘नदीजोड प्रकल्पाद्वारे दुष्काळावर करणार मात’/२
कोकण रेल्वे भारतीय रेल्वेत विलीन होण्याचा मार्ग मोकळा/५
उरणच्या प्रियांशीने रचला विंडसर्फिंगमध्ये इतिहास/८

## यंदा लाल किल्ल्यावरून पहिल्यांदाच गायले जाणार ‘वंदे मातरम्’



**नवी दिल्ली :** भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाचा मुख्य सोहळा शनिवारी (दि.१५) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत लाल किल्ल्यावर साजरा होणार आहे. वंदे मातरम्च्या १५०व्या वर्षपूर्तीनिमित्त यंदा पहिल्यांदाच लाल किल्ल्यावरून हे राष्ट्रीय गीत गायले जाणार आहे. या सोहळ्यास संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राज्यमंत्री संजय सेठ, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल एन.एस. राजा सुब्रमणी, हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए.पी. सिंग, नौदल प्रमुख ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन, लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ध्वजारोहण झाल्यानंतर तिरंग्याला राष्ट्रीय सलामी दिली जाईल. लष्करी बँड पथक वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताची धून वाजवेल. त्यावेळी लाल किल्ल्यावर उपस्थित सर्वजण राष्ट्रीय गीत गातील. यानंतर राष्ट्रगीताचे गायन करण्यात येईल. मग पुष्पवर्षाव होईल.

# पनवेलमध्ये भरपावसात देशभक्तीचा जागर

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा पदयात्रा उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि देश प्रथम या भावनेचा जागर करणाऱ्या भव्य तिरंगा पदयात्रेचे गुरुवारी (दि.१३) पनवेल शहरात उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजप पनवेल विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आयोजित या पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्यागाची आणि बलिदानाची आठवण करून देतानाच नव्या पिढीमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ व्हावी हा या पदयात्रेमागील प्रमुख उद्देश होता. हातात तिरंगा ध्वज घेऊन नागरिक पदयात्रेत सहभागी झाल्याने संपूर्ण पनवेल शहर राष्ट्रभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले. विशेष म्हणजे पदयात्रेदरम्यान पावसाची संततधार सुरू होती, तरीही या पावसाची पर्वा न करता युवक, महिला, ज्येष्ठ आणि नागरिक मोठ्या उत्साहाने पदयात्रेत सहभागी झाल्याचे पाहावयास मिळाले.

या तिरंगा पदयात्रेला आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथून सुरुवात झाली. तिरंग्याने सजलेले रस्ते, देशभक्तीपर घोषणा आणि नागरिकांच्या चेहऱ्यावरील उत्साह यामुळे पनवेल शहराला जणू राष्ट्रभक्तीच्या उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते. हातात तिरंगा घेऊन देशभक्तीच्या उत्साहात सहभागी झालेले युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध क्षेत्रांतील नागरिक हे या पदयात्रेचे विशेष आकर्षण ठरले. तिरंगा पदयात्रेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये एकता, देशाभिमान आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश पोहचविण्यात आला.

### नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

या पदयात्रेत ज्येष्ठ नागरिक, महिला व युवक युवतींचा विशेष उत्साह पाहायला मिळाला. हातात तिरंगा घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या तरुणाईने देशभक्तीपर घोषणांनी वातावरणात उत्साह निर्माण केला. महिलांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत राष्ट्रीय उत्सवात आपला सहभाग दर्शविला. पदयात्रेच्या मार्गावर नागरिकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी लोकांनी पदयात्रेचे स्वागत केले.

पदयात्रेत आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, मनपा महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, जयंत पगडे, प्रभाग समिती सभापती मधू पाटील, अजय बहिरा, रवींद्र भगत, रवी जोशी, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, मयुरेश नेतकर, वाहतूक सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रभूदास भोईर, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत यांच्यासह माजी सैनिक, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध शाळांचे विद्यार्थी आणि नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

देशाच्या विकासात प्रत्येक नागरिकाने आपले योगदान द्यावे, राष्ट्रीय एकात्मता अधिक मजबूत करावी आणि देशहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असा संदेश या तिरंगा पदयात्रेतून देण्यात आला. पदयात्रा पुढे मार्गक्रमण करत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्याजवळून टपाल नाका, मिरची गल्लीमार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहचली. या ठिकाणी पदयात्रेचा समारोप करण्यात आला.

या भव्य तिरंगा पदयात्रेमुळे पनवेलमध्ये स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवाला विशेष रंगत आली. नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे पदयात्रेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक आणि सहभागी नागरिकांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## विरोधक पळपुटे! समोरासमोर चर्चा करण्याची त्यांच्यामध्ये हिंमत नाही -मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई : प्रतिनिधी**

"विरोधी पक्षातील नेत्यांमध्ये संसदेत समोरासमोर चर्चा करण्याची हिंमत नाही. ते पळपुटे आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानावर जर विरोधकांचा खरोखरंच विश्वास असता तर त्यांनी गोंधळ घालण्याऐवजी संसदेत चर्चा करून दाखवली असती", असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.१३) केला.

संसदेत चर्चा झाली असती तर विरोधकांचे पितळ उघडे पडले असते, म्हणूनच त्यांनी जाणीवपूर्वक चर्चेपासून पळ काढल्याचा टोलाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी लगावला.

मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विरोधक सातत्याने संविधानाचा आणि लोकशाहीचा दाखला देत असतात, मात्र संविधानाने निर्माण केलेल्या लोकशाही व्यवस्थेतील सर्वोच्च आणि महत्त्वाचे व्यासपीठ हे संसद आहे. संसदेतील अर्थपूर्ण चर्चा हे लोकशाहीचे प्रमुख अंग आहे, पण विरोधक या चर्चेला घाबरत आहेत, कारण संसदेत चर्चा झाल्यास त्यांचा दुटप्पी आणि दुहेरी चेहरा संपूर्ण देशाच्या जनतेसमोर येईल, अशी भीती त्यांना सतावत आहे.

संसदेत चर्चा झाली, तर झारखंडचा मुद्दा उपस्थित होईल. तेथे त्यांनी घेतलेल्या भूमिकेचे आणि केलेल्या कृत्यांचे उत्तर त्यांना जनतेला द्यावे लागेल. या प्रश्नांची उत्तरे देणे टाळण्यासाठीच विरोधकांनी संसदेतून पळ काढण्याची भूमिका घेतली, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, सुरुवातीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे या विषयावर उत्तर देत नसल्याचे कारण पुढे करत विरोधकांनी चर्चेला नकार दिला होता, परंतु स्वतः गृहमंत्र्यांनी संसदेत उत्तर देण्यास आपण तयार असल्याचे स्पष्ट केल्यानंतरही हे पळपुटे मागे हटले. हा संविधानाचा आणि लोकशाहीचा अपमान आहे.

विरोधकांना देशातील तरुणांशी, त्यांच्या रोजगाराशी आणि शिक्षणाशी काहीही देणेघेणे राहिलेले नाही. त्यांना संसदेत गोंधळ घालायचा आहे आणि टीव्हीसमोर चमकून प्रसिद्धी मिळवायची आहे. लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराचा असा राजकीय वापर करण्यापेक्षा दुसरे मोठे दुर्दैव असू शकत नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षांचा समाचार घेतला.

## निवडक

### कुर्ला दरड दुर्घटनेतील मृतांचा आकडा आठवर

**मुंबई :** कुर्ला दरड दुर्घटनेतील मृतांचा आकडा आठवर पोहचला आहे. राजावाडी रुग्णालयात दाखल केलेल्या तरुणाला डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मृत असल्याचे घोषित केले. सद्दाम वझीर अली खान (२८) असे त्याचे नाव आहे. कुर्ल्यातील गौशिया चाळीवर बुधवारी मध्यरात्री दरड कोसळली होती. या घटनेत आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाला असून सात जखमींवर उपचार सुरू आहेत.

### दोन एसटी बसची धडक; दोघांचा मृत्यू, १६ जखमी

**सांगली :** खानापूर तालुक्यातील विटाजवळील रेवणसिद्ध घाटात गुरुवारी (दि.१३) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास दोन एसटी बसची समोरासमोर धडक झाली. या अपघातात दोन प्रवाशांचा मृत्यू झाला असून १५ ते १६ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी दोन प्रवाशांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.



(छाया : संतोष चौकर)

**श्रीवर्धन : आरावी समुद्रकिनाऱ्यावर आलेल्या पुण्यातील पर्यटकांनी आपली कार बीचवर पार्क केली होती. सेल्फी काढण्यात आणि रील बनवण्यात दंग असलेल्या या पर्यटकांना समुद्राला आलेल्या भरतीचे भान राहिले नाही. त्यामुळे ही गाडी बुडायला लागली. सुदैवाने वेळीच जेसीबी उपलब्ध झाल्याने रस्सी लावून गाडी बाहेर काढण्यात आली, मात्र आत पाणी जाऊन नुकसान झाले आहे.**

## नवनिर्वाचित प्रभाग समिती सभापतींनी स्वीकारला पदभार

### पनवेलच्या विकासाला मिळणार अधिक गती




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित प्रभाग समिती सभापतींनी गुरुवारी (दि.१३) आपापल्या प्रभाग समिती कार्यालयात अधिकृतपणे पदभार स्वीकारून कामकाजाला सुरुवात केली. यावेळी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांनी सर्व सभापतींचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत प्रभाग समिती ‘अ’मधून रवींद्र भगत, ‘ब’मधून मधू पाटील, ‘क’मधून रवी जोशी आणि ‘ड’मधून अजय बहिरा हे विजयी झाले आहेत. चारही सभापतींनी आपापल्या प्रभाग समिती कार्यालयात पदभार स्वीकारला. सभापतींची निवड झाल्यामुळे आता स्थानिक पातळीवरील नागरिकांच्या समस्या अधिक वेगाने सुटतील तसेच प्रभागांमधील विकासकामांना अधिक गतिमान, पारदर्शक आणि प्रभावी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या पदग्रहण सोहळ्याला प्रमुख मान्यवरांसह नगरसेवक प्रवीण पाटील, मनोज भुजबळ, एकनाथ गायकवाड, विकास घरत, अमर पाटील, डॉ. अरुणकुमार भगत, नरेश ठाकूर, समीर कदम, दशरथ म्हात्रे, हॅप्पी सिंग, राजेंद्र शर्मा, प्रदीप भगत, समीर ठाकूर, रामदास शेवाळे, नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता गोवारी, कुसुम म्हात्रे, अनिता पाटील, सरस्वती काथारा, मोनिका महानवर, मनाली ठाकूर, परेशा पटेल, प्रीती जॉर्ज, रूचिता लोंढे, अस्मिता घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, विजय चिपळेकर, भाजपचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, ब्रिजेश पटेल, अशोक मोटे, भाऊ भगत, अमर उपाध्याय, सचिन वास्कर, हर्षवर्धन पाटील, रूपेश नागवेकर, प्रवीण बेरा, तेजस जाधव यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतक उपस्थित होते.

## एमएनएम विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या गव्हाण–कोपर येथील एमएनएम विद्यालय आणि टीएनजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले आहे. संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे कौतुक केले.

इयत्ता चौथीमधील रूद्रा राजेंद्रकुमार ठाकूर, अर्थव जिवाबा पोवार, प्रांजल दयानंद रेडेकर; तर सातवीत शिकणाऱ्या रोहिणी रवींद्र शिरसाट, वेदक नरेंद्र ठाकूर, कृतिका सचिन पवार, आरव पंढरीनाथ भिलारे, विराज विलास काळे यांनी शिष्यवृत्ती संपादन करून विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखली.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गौरव केला. यावेळी विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, जेबीएसपी संस्थेचे स्टेट बोर्ड इन्स्पेक्टर संतोष चव्हाण, दर्शन ठाकूर यांच्यासह प्राचार्य सायली वडवलकर, पर्यवेक्षक अरुण जोशी, प्रणिता गोळे, शिष्यवृत्ती प्रभारी विभाग प्रगती यशवंतराव, शुभांगी थोरात उपस्थित होते. सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री बादल यांच्यावर नांदेडमध्ये हल्ला

### आरोपीला अटक

**नांदेड : प्रतिनिधी**



पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीरसिंह बादल यांच्यावर गुरुवारी (दि.१३) नांदेड येथील गुरुद्वारा परिसरात एका अज्ञात इसमाने तलवारीने हल्ला केला. पोलिसांनी हल्लेखोराला अटक केली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

सुखबीरसिंह बादल हे पत्नी तथा खासदार हरसिमरत कौर बादल यांच्यासह नांदेडमध्ये दर्शनासाठी आले होते. गुरुद्वार परिसरात निहंग पोशाखात आलेल्या एका इसमाने त्यांच्यावर तलवारीने अचानक वार केला. सुरक्षा रक्षक आणि उपस्थितांनी तत्परता दाखवल्याने मोठा अनर्थ टळला, मात्र यात सुखबीरसिंह बादल यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



# नदीजोड प्रकल्पाद्वारे राज्यातील दुष्काळावर मात करणार : मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

एकात्मिक जल व्यवस्थापनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व भाग दुष्काळमुक्त करण्यासाठी नदीजोड प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पाला सीडब्ल्यूसीची मान्यता मिळाल्यानंतर याच वर्षी किंवा पुढील वर्षाच्या सुरुवातीला प्रकल्पाचे काम सुरू करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या (एमडब्लूआरआरए) एकविसाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या अध्यक्ष श्वेताली ठाकरे, प्राधिकरणाचे सदस्य, जलसंपदा विभागाचे अधिकारी व अभियंता कार्यक्रमास उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी विविध प्रकल्पांच्या माध्यमातून गोदावरी खोऱ्यात आणल्यास उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील तुटीची खोरी संतुलित करता येतील. या भागांना दुष्काळमुक्त करण्याचे स्वप्न हळूहळू पूर्णत्वाकडे जात असून काही प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे, तर काही प्रकल्प सविस्तर प्रकल्प अहवालाच्या टप्प्यावर आहेत. यासाठी काम करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे बोलताना सांगितले की, राज्यात शेती तसेच पिण्यास व उद्योगांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे काम केले जात आहे. अधिक पाणी उपलब्ध असलेल्या खोऱ्यांमधील पाणी तुटीच्या खोऱ्यांमध्ये नेण्यासाठी नदीजोड प्रकल्प महत्त्वाचे आहेत. वैनगंगा-नळगंगासह मान्यता मिळालेल्या विविध नदीजोड प्रकल्पांची कामेही सुरू करण्याचे नियोजन आहे. यातून दुष्काळी भागातदेखील मुबलक पाणी उपलब्ध होईल.

देशातील पहिले जलसंपत्ती नियमन प्राधिकरण महाराष्ट्रात स्थापन झाले. सर्वाधिक व्याप्ती असलेल्या गोदावरी खोऱ्याचा आराखडा सर्वप्रथम तयार करण्यात आला. त्यानंतर कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिनी नद्या आणि महानदी क्षेत्राचे आराखडे तयार करण्यात आले. हे सहा आराखडे एकत्र करून ऑक्टोबर २०१८मध्ये महाराष्ट्राचा एकात्मिक जल आराखडा तयार करण्यात आला. असा आराखडा तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.२०२४ मध्ये या एकात्मिक जल आराखड्यात आवश्यक बदल करून नदीजोड प्रकल्पांचाही समावेश करण्यात आला. वैनगंगा-नळगंगा हा विदर्भातील दुष्काळ दूर करण्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे, असेही त्यांनी नमूद केले.

राज्यातील ४० लाख हेक्टर सिंचन क्षमता प्रभावीपणे वापरण्यासाठी पाणी कार्यक्षमता व योग्य पीकपद्धतीवर भर देत जलसंपदा व कृषी विभागाने समन्वयाने काम करावे. महाराष्ट्राला जलसंपत्ती क्षेत्रात अग्रणी ठेवण्यासाठी पुढील पिढीतील सुधारणा व धोरणांवर भर द्यावा, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग करून चौकटीबाहेरील उपाययोजना राबवाव्यात. योग्य नियोजन व आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दुष्काळी भागात बारमाही शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊ शकते असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## भाजपची अलिबागमध्ये तिरंगा रॅली



**अलिबाग : प्रतिनिधी**

हर घर तिरंगा या अभियानाच्या निमित्ताने गुरुवारी (दि.११) अलिबागमध्ये भाजपातर्फे तिरंगा रॅली काढण्यात आली.

अलिबाग शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. एस टी स्टँड , महावीर चौक, बालाजीनाका, मारुतीनाका, जाम मशीद, शिवाजी चौक, फुलोरा हॉटेल या मार्गाने ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ आली. येथे राष्ट्रगीत व राज्यगीत याचे सामूहिक गायन करून रॅलीची सांगता करण्यात आली.

नगरसेवक अ‍ॅड.अंकित बंगेरा, भाजपा महाला आघाडी दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष चित्रा पाटील, पंचायत समिती सदस्य प्रियदर्शनी पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष एड. आस्वाद पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, दक्षिण अलिबाग तालुका अध्यक्ष अशोक वार्गे, वैशाली बंगेरा , निलेश गायकर, चेतन पाटील, वृंदा करात, तनुजा पेरेकर, सुनील दामले, मयुर चव्हाण, शलाका कोंडे, मयुर झावरे आदी या रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

## फाळणी भयावहता स्मृतिदिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेतर्फे आज विशेष कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या फाळणीच्या काळातील वेदनादायी घटना, त्याग, संघर्ष आणि असंख्य नागरिकांनी सोसलेल्या यातना या दुःखद स्मृतींची आठवण आणि हुतात्म्यांना श्रद्धांजली देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने 'फाळणी एक कहाणी' या विशेष नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमीला पाटील, सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक-नगरसेविका यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# पेण शहरातील तिरंगा रॅलीने घडले राष्ट्रभक्तीचे दर्शन

**पेण : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाच्या पावन पर्वाच्या निमित्ताने राष्ट्रभक्तीचा जोश आणि देशप्रेमाची भावना जनमानसात जागृत करण्यासाठी आज पेण शहरात पालिकेच्या माध्यमातून भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅली मध्ये माजी सैनिकांसह विविध शाळांमधील हजारो विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाल्याने सदर तिरंगा रॅली मधून राष्ट्रभक्तीचे दर्शन घडले. यावेळी बोलताना नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी देशाचे क्रांतिकारक, स्वातंत्र्यवीर, आणि देशाचे सैनिक यांना सलाम करण्यासाठीच या रॅलीचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.




या रॅलीमध्ये माजी सैनिकांसह आमदार रवीशेठ पाटील, माजी खासदार धैर्यशील पाटील यांची विशेष उपस्थिती पहायला मिळाली.

स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांनी हातभार लावत आपले बलिदान दिले त्याची आठवण म्हणून तसेच देशाच्या सीमेवर कोणत्याही सुखाची अपेक्षा न करता दिवस रात्र डोळ्यात तेल घालून आपले आणि आपल्या देशाचे रक्षण करण्यासाठी सज्ज असलेल्या सैनिकांना सलाम करण्यासाठी आजच्या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले असल्याचे नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगत असतानाच आपल्या समृद्ध देशातील सर्व जाती धर्मांना एकत्र आणणारा धागा म्हणजे आपल्या देशाचा तिरंगा असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्र प्रथम ही संकल्पना रुजली गेली पाहिजे ही आमची मनापासून इच्छा असल्याने आम्ही शालेय विद्यार्थ्यांना या रॅली मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते असे नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगितले.तर स्वातंत्र्य सैनिकांच्या कष्टातून मिळालेले स्वातंत्र्य आणि बलिदानाचे प्रतीक म्हणून आजच्या रॅलीत आजी माजी सैनिक आणि हजारो नागरिक सहभागी झाले असल्याचे माजी खासदार धैर्यशील पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.यावेळी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुरेंद्र ठाकूर,उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, पालिकेचे सर्व सभापती, नगरसेवक, नगरसेविका, जी.प. सभापती वैकुंठ पाटील, प्रभाकर म्हात्रे,पं.स. सभापती स्मिता पाटील, उपसभापती संजय डंगर, जी.प. माजी अध्यक्षा ॲड निलिमा पाटील, युवा नेते ललित पाटील, पालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील Os गणेश ठाकूर लेखापाल किरण शाह आरोग्य अधिकारी दया गावंड शिवाजी चव्हाण उमंग कदम प्रशांत ढवळे कर्मचारी उपस्थित होते.

सदर रॅलीच्या माध्यमातून भारत माता की जय, जय जवान जय किसान, छत्रपती शिवाजी महाराज की जय यांसह देशभक्तीपर गीते गाऊन संपूर्ण पेण शहर निनादुन गेले होते. सदर रॅलीत विविध विद्यार्थ्यांनी भारतमाता, झाशीची राणी, स्वातंत्र्य सैनिक, महात्मा गांधी यांसह देशासाठी विशेष कामगिरी करणाऱ्या वीर पुरुषांच्या वेशभूषा करण्यात आल्या होत्या.

## महाडमध्ये अवैध दारूसाठा जप्त; शहर पोलिसांची कारवाई; गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरूच ठेवला असून ११ ऑगस्ट रोजी केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात अवैध दारूसाठा आणि एक दुचाकी असा एकूण ६९ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अमित चंद्रकांत साळुंके (वय ३८, रा. वरंध, ता. महाड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



महाड शहर पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक प्रदीप नाईक व त्यांच्या पथकाला महाड एस.टी. बसस्थानक परिसरातील स्वच्छतागृहाजवळ एक इसम संशयास्पदरीत्या हिरवट-पांढऱ्या रंगाची प्लास्टिक गोणी घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी ११ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ८ वाजता सदर ठिकाणी छापा टाकला. यावेळी संशयित इसम अमित साळुंके याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून विविध ब्रँडच्या व्हिस्कीच्या बाटल्या तसेच देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या.याशिवाय टीव्हीएस स्कूटी देखील पोलिसांनी जप्त केली आहे.या कारवाईत एकूण ६९ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पालीत मोकाट कुत्र्यांचा उच्छाद; प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली शहरात मोकाट व भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, त्यांच्या दहशतीमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. शहरातील विविध भागांत झुंडीने फिरणाऱ्या कुत्र्यांमुळे विशेषतः लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच पादचारी आणि दुचाकीस्वारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



पालीतील हटाळेश्वर चौक, बाजारपेठ, बसस्थानक, बँक ऑफ इंडिया परिसर, विविध आळ्या तसेच कचरा कुंड्यांच्या आसपास मोकाट कुत्र्यांचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दिवसाढवळ्याही आणि रात्रीच्या वेळीही कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर फिरताना दिसते. एखादा पादचारी, लहान मूल किंवा दुचाकीस्वार त्यांच्या जवळून जाताच हे कुत्रे थेट अंगावर धावून येत असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे.

पाली शहरातील अनेक ठिकाणी लहान मुले रस्त्यावर खेळण्यासाठी किंवा ये-जा करण्यासाठी बाहेर पडतात. मात्र मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. मोकाट कुत्र्यांचा त्रास केवळ रस्त्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. अनेकदा कुत्री इमारतींच्या आवारात तसेच इमारतीमध्ये घुसतात. बाहेर ठेवलेल्या चपला उचलून नेणे, चपला चावून त्यांची नासधूस करणे, कचरा व घाण इमारतीच्या परिसरात आणून टाकणे, अशा प्रकारांना नागरिकांना वारंवार सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे नगरपंचायतीने या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

## 'रोटरी'तर्फे गरजू विद्यार्थ्यांना मोफत आयडियल स्टडी ॲपचे वितरण



**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब पनवेल सनराईजतर्फे सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक शाळा, कळंबोली येथील दहावीतील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना 'आयडियल स्टडी ॲप'चे मोफत वितरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळेतील १०० विद्यार्थ्यांना ॲपची सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली.

या ॲपमध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी विश्लेषणात्मक पाठ्यपुस्तके, प्रश्नोत्तर सरावपत्रिका, व्हिडिओ स्वरूपातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच शाळा आणि घर या दोन्ही ठिकाणी उपयुक्त ठरणारे शैक्षणिक साहित्य समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेची प्रभावी तयारी करण्यास मोठी मदत होणार आहे.

## दि.गो. तेंडुलकर विश्रामधामात वृक्षारोपण मोहीम

**लोणावळा : प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या लोणावळा येथील कै. दि. गो. तेंडुलकर विश्रामधामात नुकत्याच करण्यात आलेल्या नूतनीकरणानंतर आता परिसर अधिक हिरवागार आणि पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने विशेष वृक्षारोपण मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत विश्रामधामाच्या परिसरात आंबा, फणस, चीकू, काजू, आवळा यांसह विविध प्रकारच्या फळझाडांची लागवड करण्यात आली.



मुंबई मराठी पत्रकार संघाने आपल्या सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी लोणावळ्यातील विश्रामधामाचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण केले आहे. विश्रामधामातील सुविधांमध्ये वाढ करण्याबरोबरच येथील नैसर्गिक सौंदर्य जपण्यावरही संघाने भर दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून परिसरात मोठ्या प्रमाणावर फळझाडे लावून त्यांचे संवर्धन करण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

या विशेष वृक्षारोपण सोहळ्यास लोणावळ्याचे माजी नगराध्यक्ष व भाजप नेते श्रीधर पुजारी, मुंबई महानगरपालिकेच्या बिल्डिंग प्रपोजल विभागाचे माजी मुख्य अभियंता मल्लेश्वर कुंटाजी, प्रभाकर कदम तसेच मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विविध वृक्षांची रोपे लावून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावण्यात आलेल्या प्रत्येक रोपाचे योग्य संगोपन आणि संवर्धन करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. लोणावळ्याच्या निसर्गरम्य वातावरणात असलेल्या दि. गो. तेंडुलकर विश्रामधामाचा परिसर आगामी काळात अधिक हिरवागार व्हावा आणि येथे येणाऱ्या पत्रकार सदस्य व त्यांच्या कुटुंबीयांना निसर्गाच्या सान्निध्यात आनंददायी अनुभव मिळावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. विश्रामधामाच्या नूतनीकरणानंतर पर्यावरण संवर्धनाची जोड देत हाती घेतलेल्या या विशेष वृक्षारोपण मोहिमेमुळे भविष्यात संपूर्ण परिसर विविध फळझाडांनी बहरणार आहे.

## महाडमध्ये बंद घरातून सोन्याचे दागिने, रोकड व मोबाईलसह ४८ हजारांचा ऐवज केला लंपास

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील जिते काजी मोहल्ला येथे एक घरफोडीची घटना उघडकीस आली आहे. बंद घराच्या बाथरूमच्या खिडकीचे लोखंडी ग्रील तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि दोन मोबाईल असा एकूण ४८ हजार रुपयांचा ऐवज लांबवला आहे. याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार घरफोडी २ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजेपासून १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेच्या दरम्यान घडली. जिते काजी मोहल्ला येथील रहिवासी जैतुन नुरमहमद काजी यांचे घर बंद असताना, अज्ञात चोरट्याने बाथरूमच्या खिडकीचे लोखंडी ग्रील तोडले व स्लायडिंगच्या काचा काढून घरात प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममधील कपाटाची तोडफोड करत चोरट्याने सोन्याच्या अंगठ्या , १५ हजार रुपयांची रोख रक्कम आणि नोकिया कंपनीचे दोन जुने मोबाईल असा किमती ऐवज लंपास केला. महाड एमआयडीसी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धावघेतली.फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात आले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# व्हिजन भारत-जेन झी संवाद ते संकल्प कार्यक्रमात विचारांची देवाणघेवाण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवा पिढीच्या विचारांना योग्य दिशा देण्यासाठी, त्यांच्यातील नाविन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी पनवेल येथे व्हिजन भारत-जेन झी संवाद ते संकल्प कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवीन पनवेल येथील देवद-विचुंबे येथील आदर्श शैक्षणिक संकुलात असलेल्या दादासाहेब श्री. धनराजजी विसपुते सभागृहात गुरुवारी (दि. १३) हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.



आदर्श शैक्षणिक समूह, सकाळ माध्यम समूह आणि पनवेल टाइम्स यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जेन झी पिढीला समाज, राष्ट्रनिर्माण, डिजिटल भारत, करिअर, सुशासन, माध्यम क्षेत्र आणि युवा नेतृत्व या विषयांवर थेट संवाद साधण्याची आणि विचारमंथन करण्याची अर्थपूर्ण संधी उपलब्ध करून देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, सकाळ माध्यम समूह व साम टीव्हीचे मुख्य संपादक निलेश खरे, ठाणे जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप आणि आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराज विसपुते यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा आणि प्रेरणादायी संवाद साधत विविध समकालीन विषयांवर सखोल मार्गदर्शन केले तसेच जेन झी पिढीची सर्जनशीलता, तंत्रज्ञानाचा सकारात्मक आणि जबाबदार वापर, सामाजिक उत्तरदायित्व, राष्ट्रभक्तीची मूल्ये आणि विकसित भारत घडविण्यात युवाशक्तीची निर्णायक भूमिका यावर विशेष भर दिला.

विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना मान्यवरांनी अत्यंत स्पष्ट, संवेदनशील आणि प्रेरणादायी उत्तरे देत कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने संवादाचे स्वरूप प्राप्त करून दिले. युवकांना मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, जो जसा आहे त्याला तसे स्वीकारत, आपल्या परीने त्यामध्ये शक्य तो बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आपण सातत्याने करीत राहिले पाहिजे. वयाचे अंतर असले तरी आपण स्वतःला या नव्या पिढीचा प्रतिनिधी म्हणून त्यांच्या समस्या, विचार आणि गरजा समजून घेण्याचा निरंतर प्रयत्न करणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच आदर्श शैक्षणिक समूहाच्या माध्यमातून तरुण विद्यार्थ्यांना योग्य संस्कार आणि उत्तम शिक्षण देऊन घडवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सातत्याने होत असल्याचे कौतुकही त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमातील एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण क्षण म्हणजे जेन झी विद्यार्थ्यांनी सर्व प्रमुख मार्गदर्शकांना आपल्या भावना, अपेक्षा आणि राष्ट्रविकासाविषयीच्या आकांक्षा व्यक्त करणारी पत्रे सुपूर्द केली. या पत्रांद्वारे युवा पिढीचा आवाज, त्यांचे प्रश्न, त्यांची स्वप्ने आणि विकसित भारताविषयीचा त्यांचा संकल्प मान्यवरांपर्यंत पोहचला.

कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सकाळ माध्यम समूहाचे समीरण गव्हाणे, पनवेल टाइम्सचे मुख्य संपादक गणेश कोळी, सकाळ माध्यम समूहाचे गणेश घोलप, खांदेश्वर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन परदेशी, आदर्श शैक्षणिक समूहाच्या संचालिका संगीता विसपुते यांच्यासह आदर्श शिक्षण संकुलातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



पनवेल : पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी तुकाराम शेळके यांची नियुक्ती करण्यात आली. याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन शेळके यांना शुभेच्छा दिल्या. सोबत जिल्हाध्यक्ष सीताराम कांबळे उपस्थित होते.

## आडिवली शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यावाटप

### *श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा उपक्रम*

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आडिवली जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.



या उपक्रमाला भाजप रोहिंजण तसेच ग्रामपंचायतचे माजी सरपंच नंदूशेठ म्हात्रे, भाजप ज्येष्ठ नेते चाहूशेठ पाटील आणि पनवेल तालुका उत्तर ग्रामीण मंडळ उपाध्यक्ष सुरेश पोरजी तसेच सामाजिक कार्यकर्ते मधुकर मोरे उपस्थित होते. उपस्थितांनी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे आभार मानले.

## श्री नारायण चैतन्य ट्रस्ट पितृपूजा सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील श्री नारायण चैतन्य ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पारंपरिक पितृपूजा कार्यक्रमाला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन उपस्थितांना व भक्तांना शुभेच्छा दिल्या.

गेल्या १५ वर्षांपासून श्री नारायण चैतन्य ट्रस्टतर्फे हा पितृपूजेचा सोहळा अत्यंत श्रद्धापूर्वक पार पाडला जात आहे. या १५ वर्षांच्या प्रवासात केवळ एका वर्षाचा अपवाद वगळता प्रत्येक वेळी या सोहळ्याला उपस्थित राहण्याचा योग आल्याचे सांगत आमदार प्रशांत ठाकूर यांनी ट्रस्टच्या सातत्यपूर्ण धार्मिक आणि सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान आचार्य श्रीमान हेम कीर्ती यांच्या हस्ते आमदार प्रशांत ठाकूर यांचा शाल व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. या धार्मिक सोहळ्याला श्री नारायण चैतन्य ट्रस्टचे अध्यक्ष भक्तवत्सलन, सचिव जयचंद्रन के. वासू, संयुक्त सचिव प्रकाश सुब्रमण्यन आणि खजिनदार शरच्चंद्र बाबू यांच्यासह अनेक मान्यवर व भाविक उपस्थित होते.

## डुंगी शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील डुंगी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवारी (दि. १३) करण्यात आले.

पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. त्यांनी विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप करून मार्गदर्शन केले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पार्टी डुंगी आणि आदेश नाईक यांच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची मदत करण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि नवा उत्साह पाहायला मिळाला.

कार्यक्रमावेळी पनवेल पंचायत समिती सभापती रंजना वास्कर यांसह पं. स. सदस्या मनीषा पाटील, भाजप पंचायत समिती विभागीय अध्यक्ष समीर केणी, माजी सरपंच शशिकांत भोईर, माजी उपसरपंच गजानन पाटील, मधुकर नाईक, सुरेश पाटील, महेंद्र पाटील, सचिन पाटील, प्रशांत पाटील, केंद्रप्रमुख अंकिता हुद्दार, मुख्याध्यापिका उमा देसाई, पल्लवी महाडिक यांसह मान्यवर, पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## अस्तित्व फाउंडेशनतर्फे उरणमध्ये भव्य मान्सून ग्राहक पेठ

**उरण : वार्ताहर**

अस्तित्व फाउंडेशन आयोजित 'मान्सून स्पेशल भव्य ग्राहक पेठ'चे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण कुटुंबासाठी खरेदी, व्यवसाय आणि नव्या संधीचा हा एक अनोखा मेळावा शनिवार (दि. १५) आणि रविवारी (दि. १६) सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत श्री राम मंदिर हॉल, पहिला मजला, गणपती चौक, उरण येथे आयोजित करण्यात आला आहे.

उद्घाटनासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून नीता महेश बालदी उपस्थित राहणार आहेत. अस्तित्व फाउंडेशनच्या अध्यक्ष सानिका कदम, सचिव पूनम पाटेकर, खजिनदार जान्हवी पंडित, सहखजिनदार रजनी कोळी, हेमा घरत, सदस्या सायली म्हात्रे, संपूर्णा थळी, स्नेहल कासारे, भारती कडू आदींचे सहकार्य लाभणार आहे.

## युईएस स्कूलमध्ये दीपपूजा

**उरण : वार्ताहर**

दीप अमावास्येच्या निमित्ताने बुधवारी (दि. १२) युईएस स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात 'दीपपूजा उत्सव' साजरा करण्यात आला. दीपपूजेसाठी माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे दिवे आणले होते. शाळेच्या व्हरांड्यातील एका टेबलावर समया, लामणदिवे, पणत्या, निरांजने असे अनेक प्रकारचे रंगीबेरंगी दिवे मांडून सजावट करण्यात आली होती.

माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुंदर समूह गीत सादर केले. युईएसचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, खजिनदार ॲड. अपूर्वा ठाकूर, सीनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सीनिअर कॉलेजच्या विभागप्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून हा सोहळा उत्साहात पार पडला.

## पनवेल तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींना पुरस्कार

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या महिला आणि बालविकास विभागामार्फत राबवण्यात आलेल्या आदिशक्ती अभियान २०२५-२६ अंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी घोषित करण्यात आलेल्या आदिशक्ती पुरस्कारांमध्ये पनवेल तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींना पुरस्कार मिळाला आहे. खेरणे खुर्द ग्रामपंचायतीने प्रथम, बारवई ग्रामपंचायतीने द्वितीय, तर ओवळे ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळवला.

महिला व बालविकास विभागामार्फत राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय आदिशक्ती पुरस्कार जाहीर करण्यात आले. पनवेल तालुक्यात अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी एकात्मिक बालविकास अधिकारी प्रवीण पाटील यांनी विविध विभागांमध्ये समन्वय साधून ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करणे, अभियानाच्या निकषानुसार कामांची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. पनवेल तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींना हा पुरस्कार मिळाल्यामुळे या ग्रामपंचायतींचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## पनवेल मनपाच्या वंदे मातरम् १५० माहिती प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या वतीने हर घर तिरंगा अभियानांतर्गत नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल आदर, राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'वंदे मातरम् भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची हाक' हे विशेष माहिती प्रदर्शन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात भरविण्यात आले. त्याचे उद्‌घाटन गुरुवारी (दि.१३) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महापौर नितीन पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर आदी उपस्थित होते.

या माहिती प्रदर्शनामध्ये वंदे मातरम् गीताचे कवी बंकिमचंद्र चॅटर्जी (चट्टोपाध्याय) यांनी कोणत्या ऐतिहासिक परिस्थितीत या गीताची निर्मिती केली, 'वंदे मातरम्'चे प्रथम प्रकाशन कधी व कुठे झाले, हे गीत प्रथम कुठे गायले गेले, त्याचे विविध भाषांमधील अनुवाद, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी केलेली संगीत रचना, 'वंदे मातरम्'चे पहिले ध्वनिमुद्रण, वंदे मातरम् संप्रदायाची माहिती तसेच मादाम भिकाजी कामा यांनी वंदे मातरम् अंकित ध्वज फडकविल्याचा ऐतिहासिक प्रसंग अशा विविध महत्त्वपूर्ण बाबींची माहिती चित्रफलकांच्या माध्यमातून मांडण्यात आली.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्यात 'वंदे मातरम्' गीताने बजावलेली प्रेरणादायी भूमिका, त्याचा इतिहास आणि देशाच्या स्वातंत्र्य चळवळीशी असलेले नाते नागरिक व विद्यार्थ्यांना जाणून घेता येणार आहे. याचबरोबर या गीताच्या संकल्पनेवर आधारित भव्य रांगोळी साकारण्यात आली. आकर्षक आणि कलात्मक पद्धतीने साकारलेल्या या रांगोळीच्या माध्यमातून राष्ट्रप्रेम व देशभक्तीचा संदेश देण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी या रांगोळीचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रध्वजाबद्दल अभिमान आणि देशभक्तीची भावना अधिक दृढ व्हावी यासाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये हर घर तिरंगा अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांना विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर महापालिका क्षेत्रात राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण होत आहे.




**श्रावण सुरू झाला की, कविमन आपोआपच श्रावणधारांसारखं बहरू लागतं. नवनवीन कल्पना त्यांच्या डोक्यातून बाहेर पडतात आणि मग दरवर्षी पावसावरील कवितांचा जणू पाऊसच पडतो. यासाठी आम्ही सर्व कवींना आग्रहानं निमंत्रित करीत आहोत. मग विचार कसला करता, उचला आपली लेखणी आणि लिहा पाऊस कविता. आम्ही त्यास यथायोग्य प्रसिद्धी देऊ...**

**श्रावण संपेपर्यंत आपण स्वत: शब्दबद्ध केलेल्या कविता 'रामप्रहर'मध्ये दररोज एक याप्रमाणे (एका कवीची एकच कविता) येत्या सोमवारपासून प्रसिद्ध करण्यात येणार आहे.**

**कवींनी आपली अप्रकाशित कविता स्वत:च्या छायाचित्रासह 'रामप्रहर'कडे टाईप करून पाठवावी. त्या कवितेला 'श्रावणधारा' या सदराखाली यथायोग्य प्रसिद्धी देण्यात येईल.**

**-मुख्य संपादक**

**पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड,**
**गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल ४१०२०६, रायगड.**
E.mail : ramprahar@gmail.com
**व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक ७७३८१०६००९**

## हरवलेली बॅग प्रामाणिक नागरिकामुळे परत

**पनवेल : वार्ताहर**

रस्त्यावर सापडलेली मौल्यवान बॅग प्रामाणिकपणे पोलिसांच्या स्वाधीन करून कळंबोलीतील एका नागरिकाने समाजासमोर आदर्श निर्माण केला. या प्रामाणिकपणाबद्दल कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

अविनाश सदाशिव घोटणे (३६, रा. कळंबोली, नवी मुंबई) यांना रस्त्यावर एक बॅग सापडली. त्यांनी कोणताही विलंब न करता ती कळंबोली पोलीस ठाण्यात जमा केली. बॅगेमध्ये सुमारे तीन लाख रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन तसेच १,५०० रुपयांची रोख रक्कम होती. दरम्यान, बॅगेच्या मालक असलेल्या शर्वरी सावंत (३४) या व्यंकट हॉटेलसमोरील रस्त्यावर घाबरलेल्या अवस्थेत उभ्या असताना कळंबोली पोलीस ठाण्याचे बीट मार्शल क्रमांक ३वरील पोलीस हवालदार सुनील ढाकणे व पोलीस शिपाई शेखर तांबे हे पेट्रोलिंगदरम्यान त्यांच्या संपर्कात आले.

त्यांनी बॅग हरवल्याची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी मोबाईलवर संपर्क साधला. त्यावेळी बॅग कळंबोली पोलीस ठाण्यात सुरक्षित असल्याचे समजले.

## न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना मिळाले नशामुक्तीचे धडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल मार्केट यार्ड पनवेल येथे ब्रह्मकुमारी पनवेल सेंटरमार्फत नशामुक्ती अभियान मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. शासनाने सुरू केलेल्या नशामुक्ती अभियानाचा भाग म्हणून सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ब्रह्मकुमारी संस्थेतर्फे ब्रह्मकुमारी तारादीदी, ब्रह्मकुमारी साधक पल्लवी बहन आणि रामनाथ भाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सर्वप्रथम मुख्याध्यापक डी. सी. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले व आपले अनुभव कथन केले. त्यानंतर ब्रह्मकुमारी साधक पल्लवी बहन यांनी शिबिर कशासाठी आहे याची माहिती सांगितली तसेच ब्रह्मकुमारी तारादीदी यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या नशेपासून कशा प्रकारे मुक्ती मिळवावी यासंबंधी मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्वांनी नशामुक्तीसंबंधी प्रतिज्ञा घेऊन नशामुक्त राहण्याची शपथ घेतली.

नशेमुळे माणसाचे जीवन कसे उद्ध्वस्त होते व त्यापासून सुटका कशी मिळवावी हे दाखवणाऱ्या एका व्हिडीओचे प्रसारणही यावेळी करण्यात आले.

## संपादकीय

# गरज सुरक्षित घरांची

मुंबईत घाटकोपर येथे बुधवारी झालेल्या दरड कोसळण्याच्या दुर्दैवी घटनेमुळे पुन्हा एकदा शहरी गरिबांच्या असुरक्षित वस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सरकारचे प्रयत्न प्रामाणिक असले व त्यांची व्याप्तीही मोठी असली तरी शहरांकडे होणारे अफाट स्थलांतर व त्यातून निर्माण होणारी घरांची गरज यांचा वेग त्याहूनही अधिक आहे.

**जोरदार पावसामुळे निवासी वस्तीवर दरड कोसळून गोरगरीब नागरिकांचा बळी जाण्याच्या मुंबईतील घाटकोपर येथील घटनेकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहता येणार नाही. या दुर्घटनेनंतर बचावकार्य वेगाने सुरू झाले, तरीही डोंगरउतारावर दाटीवाटीने उभ्या राहिलेल्या या वस्तीतून वाट काढणे अग्निशमन दलाच्या गाड्यांना शक्य झाले नाही. परिस्थितीजन्य अडथळ्यांमुळे मोलाचा वेळ वाया गेला. या घटनेत सात जणांचा मृत्यू झाला तर आणखी सात जण जखमी आहेत. यातील काहींची प्रकृती गंभीर असल्याचेही समजते. वास्तविक दरड कोसळण्याची अथवा भूस्खलन होण्याची शक्यता असलेल्या धोक्याच्या ठिकाणी रहिवाशांनी राहू नये यासाठी महापालिकेकडून नागरिकांना नेहमी सावधान केले जाते. ही दुर्घटना घडली तेथील नागरिकांनाही पालिका प्रशासनाने तशा सूचना दिल्या होत्या. मात्र रहिवाशांनी या सूचनांकडे दुर्लक्ष केले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गात मोडणाऱ्या नागरिकांच्या या वर्तणुकीतही नवीन काहीच नाही. या परिस्थितीमागील कारणे समजून घेऊनच अशा दुर्दैवी घटना वारंवार घडू नयेत यासाठी उपाययोजना करावी लागेल. महाराष्ट्रातील मोठ्या संख्येने स्थलांतरित लोकसंख्या असणाऱ्या सर्व शहरांमध्ये सुरक्षित घरांचा प्रश्न कमीअधिक प्रमाणात भेडसावतो आहे. रोजगाराच्या शोधात मुंबईत अथवा राज्यातील अन्य शहरांमध्ये येणारे लाखो स्थलांतरित कष्टकरी शहराच्या अर्थव्यवस्थेला आपल्यापरीने हातभार लावतात. बांधकाम मजूर, घरकाम करणारे, हॉटेल कामगार, वाहनचालक व छोटे व्यावसायिक या वर्गाला शहरात राहायचे आहे. पण मुंबईतील व अन्य शहरांतीलही घरांच्या किंमती त्यांच्या आवाक्याबाहेरच्या असतात. परिणामी जागा मिळेल तिथे, मग तो डोंगरउतार असो की नाल्याचा काठ, रेल्वेमार्गालगत किंवा इतर धोकादायक जागांवर अनधिकृत वस्त्या उभ्या राहतात. या एकंदर परिस्थितीमागील वास्तव ध्यानात न घेता निव्वळ सरकारला दोष देणे सोपे आहे. पण हा प्रश्न वरकरणी दिसतो त्यापेक्षा अधिक गुंतागुंतीचा आहे. राज्य सरकारने पात्र झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी एसआरए, म्हाडा आणि इतर यंत्रणांच्या माध्यमातून अनेक योजना पुढे नेल्या आहेत. मात्र पुनर्वसनाची प्रक्रिया पात्रता, सर्वेक्षण, कायदेशीर वाद, विकासक, संक्रमणकालीन निवास आणि प्रत्यक्ष बांधकाम अशा अनेक टप्प्यांतून जाते. त्यामुळे सरकारचे प्रयत्न वेगाने सुरू असूनही परिणाम दिसायला वेळ लागतो. आता तर मुंबईखेरीज ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शहरांकडेही रोजगारासाठी वाढते स्थलांतर होत आहे. आतापासून या स्थलांतरित लोकसंख्येकरिता नियोजन केले नाही तर या शहरांमध्येही अनधिकृत असुरक्षित वसाहती, वाहतूक, पाणी आणि स्वच्छता यांचा प्रश्न गंभीर होईल. धोकादायक वस्त्यांचे वैज्ञानिक सर्वेक्षण, स्थलांतर, कायमस्वरूपी पुनर्वसन आणि परवडणाऱ्या भाड्याच्या घरांचा मोठा साठा निर्माण करण्याची गरज दिसते आहे. या साऱ्यात नागरिकांची भूमिका देखील महत्त्वाची आहे. धोकादायक भागांबाबत प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे, संभाव्य धोक्याची चिन्हे दिसताच माहिती देणे आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या उपक्रमांमध्ये सहभागी होणे या गोष्टी तितक्याच आवश्यक आहेत. सुरक्षित शहर उभारण्याची जबाबदारी ही प्रशासन आणि समाज या दोघांचीही आहे.**

# महाराष्ट्राच्या दुग्धव्यवसायाची नवी श्वेतक्रांती

हजारो वर्षांपूर्वी मानवाने जंगलातील प्राण्यांना आपल्या सहजीवनाचा भाग बनविले. शेती सुरू झाली, स्थिर वस्ती निर्माण झाली आणि त्याचबरोबर पशुपालनाची संस्कृती विकसित झाली. गाय, म्हैस यांसारखे प्राणी केवळ अन्नाचा स्रोत राहिले नाहीत; ते शेती, दूध, वाहतूक, खत आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आधार बनले. त्या काळातील पशुपालकाला कोणते जनावर अधिक दूध देते, कोणते अधिक ताकदवान आहे किंवा कोणते वातावरणाशी जुळवून घेते, याचा अनुभवातून अंदाज घ्यावा लागत होता.

आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. पूर्वी पशुपालक अनुभवाच्या आधारे उत्तम जनावर निवडत होता; आज विज्ञान जनावराच्या आनुवंशिक गुणवत्तेचा अभ्यास करून पुढील पिढी कशी असावी, हे ठरविण्याच्या टप्प्यावर पोहोचले आहे. हजारो वर्षांच्या पशुपालन परंपरेने आता प्रयोगशाळेतील अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साथ घेतली आहे. महाराष्ट्रातील दुग्धव्यवसायात लिंग निश्चित वीर्यमात्रा (Sex Sorted Semen-SSS) आणि भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान यांचा वाढता वापर हा याच परिवर्तनाचा नवा अध्याय आहे.

भारतीय उपखंडात पशुपालनाची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. सिंधू संस्कृतीच्या काळातही गायी , म्हशी, यांसारखे पशू मानवी जीवनाचा भाग होते. नदीम्हशीच्या पाळीवीकरणाबाबतच्या आनुवंशिक अभ्यासांमध्ये तिचा उगम भारतीय उपखंडाशी जोडला जातो आणि तिच्या पाळीवी करणाची प्रक्रिया सिंधू संस्कृतीच्या उत्तर टप्प्यापूर्वी किंवा त्या आसपास सुरू झाल्याचे संकेत मिळतात.

त्या काळात उत्कृष्ट जनावरांची निवड ही निरीक्षण आणि अनुभवावर आधारित होती. ज्या गायी अधिक दूध देत, ज्या म्हशी निरोगी राहत किंवा ज्या पशूंची संतती चांगली होत, त्यांचे संगोपन केले जात असे. पिढ्यान्‌पिढ्या अशा निवडीमधून स्थानिक पशुधनाच्या विविध जाती आणि प्रकार विकसित झाले.

आज त्याच प्रक्रियेला विज्ञानाने नवी दिशा दिली आहे. अनुवंशिक गुणवत्ता आता केवळ बाह्य रूप किंवा अनुभवावरून ठरवली जात नाही; निवडक पैदास, वीर्यमात्रा, भ्रूण आणि आधुनिक प्रजनन तंत्रज्ञानाच्या मदतीने उच्च गुणवत्तेची पुढील पिढी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.



नैसर्गिक पद्धतीत किंवा पारंपरिक प्रजनन पद्धतीत एका गायीपासून साधारणपणे वर्षाला एक वासरू मिळते. त्यामुळे एखाद्या अत्यंत उच्च गुणवत्तेच्या दाता गाईचे आनुवंशिक गुण पुढील पिढीत मोठ्या प्रमाणात नेण्यासाठी अनेक वर्षे लागतात. याच ठिकाणी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान मोठा बदल घडवते. उच्च अनुवंशिक गुणवत्ता असलेल्या दाता गाईच्या स्त्रीबीजांचे संकलन करून प्रयोगशाळेत निवडक उच्च गुणवत्तेच्या वळूच्या वीर्याने फलन केले जाते. त्यातून तयार झालेला भ्रूण प्राप्तकर्ता गाय किंवा म्हशीच्या गर्भाशयात प्रत्यारोपित केला जातो. त्यामुळे एका उच्च गुणवत्तेच्या दाता गाईच्या आनुवंशिक क्षमतेचा मोठ्या संख्येने पुढील पिढीत प्रसार करणे शक्य होते.

या तंत्रज्ञानामुळे एका उच्च गुणवत्तेच्या दाता गाईपासून वर्षभरात ४० ते ५० उच्च दर्जाची वासरे मिळविण्याची क्षमता निर्माण होऊ शकते. म्हणजेच, पूर्वी एका उत्कृष्ट गाईची गुणवत्ता एका वासरापुरती मर्यादित राहायची; आता त्याच आनुवंशिक क्षमतेचा अनेक वासरांमध्ये प्रसार करता येतो. याच अर्थाने ETT/IVF हे पशुपालनातील 'टेस्ट ट्यूब बेबी' तंत्रज्ञान म्हणून ओळखले जाते.

पशुपालकाच्या दृष्टीने दुग्धव्यवसायात मादी वासराला विशेष आर्थिक महत्त्व आहे. पारंपरिक कृत्रिम रेतनात नर किंवा मादी वासरू जन्मण्याची शक्यता साधारण ५०:५० असते. मात्र, लिंग निश्चित वीर्यमात्रा म्हणजे Sex Sorted Semen तंत्रज्ञानामुळे मादी वासरू जन्मण्याची शक्यता ९० टक्यांपेक्षा अधिक करण्याचे उद्दिष्ट साध्य करता येते. या प्रक्रियेत मादी संततीसाठी आवश्यक 'X' गुणसूत्र असलेले शुक्राणू निवडून वीर्यमात्रा तयार केली जाते. यामुळे गोठ्यात दूध उत्पादनासाठी उपयुक्त कालवडींची संख्या वाढविण्याची संधी मिळते. उच्च वंशावळीच्या वळूची वीर्यमात्रा वापरल्यास अधिक दूध उत्पादनक्षम कालवडी मिळण्याची शक्यता वाढते. त्याचवेळी नर वासरांच्या संगोपनावरील अनावश्यक खर्चात बचत होऊ शकते.

हे तंत्रज्ञान सर्वच जनावरांसाठी सरसकट वापरण्याऐवजी सुदृढ कालवडी तसेच प्रथम किंवा द्वितीय वेतातील निरोगी गाई-म्हशी, योग्य माजाची वेळ आणि तज्ज्ञ पशुवैद्यकीय मार्गदर्शन यांचा विचार करून वापरणे आवश्यक आहे. कारण सेक्स सॉर्टेड वीर्यमात्रेतील शुक्राणूंची संख्या तुलनेने कमी असल्याने सामान्य वीर्यमात्रेपेक्षा गर्भधारणेचे प्रमाण काहीसे कमी असू शकते.

प्राचीन पशुपालकासाठी आपल्या परिसरातील पशुधनाची जात आणि गुणधर्म टिकविणे महत्त्वाचे होते. आधुनिक पशुविज्ञान त्यापुढे जाऊन वंशसंवर्धनासोबत अनुवंशिक सुधारणा करण्याची संधी देत आहे. गिर, साहिवाल, थारपारकर या राष्ट्रीय जातींसोबत महाराष्ट्रातील खिलार, डांगी, देवणी, लाल कंधारी, गवळाऊ या गोवंशांच्या तसेच नागपुरी, मराठवाडी आणि पंढरपुरी म्हशींच्या संवर्धनासाठी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरत आहे. याचा अर्थ केवळ अधिक दूध देणारे पशुधन तयार करणे एवढाच नाही. स्थानिक हवामानाशी जुळणारे, रोगप्रतिकारक क्षमता असलेले, शारीरिकदृष्ट्या सक्षम आणि चांगली दूध उत्पादनक्षमता असलेले पशुधन निर्माण करणे, हा या तंत्रज्ञानाचा व्यापक उद्देश आहे.

महाराष्ट्रात भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाच्या वापरात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत राज्यातील शासकीय, निमशासकीय आणि खासगी संस्थांच्या माध्यमातून १४,६९८ भ्रूण प्रत्यारोपण करण्यात आले असून त्यातून २,४७३ उच्च गुणवत्तेच्या वासरांचा जन्म झाला आहे. पुण्यातील ताथवडेतील बाह्यफलन व भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा मार्च २०२१ पासून महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या अंतर्गत कार्यरत आहे. येथे २४० OPU सत्रे पूर्ण झाली. ७८० भ्रूण तयार, ५५६ भ्रूण प्राप्तकर्ता जनावरांमध्ये प्रत्यारोपित व १५० भ्रूण गोठवून ठेवण्यात आले आहेत.

जुलै २०२६पर्यंत या तंत्रज्ञानातून ६३ वासरांचा जन्म झाला असून ५० हून अधिक गाभण जनावरांकडून पुढील वासरांच्या जन्माची अपेक्षा आहे. ताथवडे प्रयोगशाळेतील कामगिरीतील एक विशेष टप्पा म्हणजे २३ जुलै २०२२ रोजी 'शीतल' या देशातील पहिल्या पंढरपुरी म्हशीच्या बछडीचा भ्रूण प्रत्यारोपणातून झालेला जन्म. मुऱ्हा म्हशीमध्ये एकाच स्त्रीबीज संकलनातून चार रेडकांच्या जन्माची नोंदही महत्त्वाची उपलब्धी आहे.

संशोधन प्रयोगशाळेत निर्माण झालेले तंत्रज्ञान प्रत्यक्ष पशुपालकाच्या गोठ्यापर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. लिंग निश्चित वीर्यमात्रेचा मूळ खर्च साधारण रु. १,२०० ते रु. १,५०० असताना महाराष्ट्र शासनाने संबंधित कंपन्यांशी करार करून ती रु. ५७५ प्रति मात्रा या दराने उपलब्ध करून घेतली आहे. केंद्राचे ४५ टक्के, राज्याचे ३० टक्के अनुदान व MahaLDB/सहकारी दूध संघामार्फत रु. १०० मदत अशा सवलतींमुळे पशुपालकांना ही वीर्यमात्रा अवघ्या रु. ८१ प्रति मात्रा दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे.

दरम्यान, डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत सुमारे ३.६६ लाख वीर्यमात्रांचे वितरण झाले आहे. याचबरोबर राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळामार्फत स्वदेशी सेक्स सॉर्टेड सिमेन तंत्रज्ञान विकसित होत आहे. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ आणि NDDB यांच्यातील सामंजस्य करार अंतिम टप्प्यात असून, भविष्यात हे तंत्रज्ञान आणखी कमी दरात उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

गोठ्यातील पारंपरिक पशुपालनाची हजारो वर्षांची परंपरा आता प्रयोगशाळेतील अत्याधुनिक विज्ञानाशी जोडली जात आहे. पशुपालकाच्या अनुभवाला आधुनिक तंत्रज्ञानाची साथ देऊन महाराष्ट्राच्या दुग्धव्यवसायाला अधिक उत्पादक, लाभदायक आणि शाश्वत बनविण्याच्या दिशेने ही नवी श्वेतक्रांतीची वाटचाल आहे.

**(साभार पशुसंवर्धन विभाग)**

## बदलते तंत्रज्ञान

# तंत्रज्ञान : मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण तंत्रज्ञानाच्या कुशीतच असतो. सगळीकडे तंत्रज्ञानच आपला पार्टनर आहे. २१व्या शतकात तंत्रज्ञान हे केवळ साधन राहिलं नाही, तर ते जगण्याची पद्धतच बनलं आहे. UPI ने खिशातलं पाकिट गायब केलं. शेतकऱ्याला हवामानाचा अंदाज ॲपवर मिळतो, विद्यार्थी गावात बसून IIT चे लेक्चर ऐकतो. तंत्रज्ञानाने 'दूरी' हा शब्दच पुसून टाकला. कोविड काळात वर्क फ्रॉम होम, ऑनलाइन शाळा नसती तर जग थांबलं असतं.




**आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील बदल**

पोर्टेबल MRI मशीनमुळे आता गावागावात निदान शक्य होत आहे. टेलिमेडिसिनमुळे मुंबईचा डॉक्टर दुर्गम भागातल्या रुग्णाला तपासतो. रोबोटिक सर्जरीने ऑपरेशनचा धोका कमी झाला. शिक्षणात तर क्रांतीच घडली. डिजिटल क्लासरूम, व्हर्च्युअल लॅब, AI ट्यूटर. गरीब घरातलं मूलही आता कोडिंग शिकून गुगलमध्ये नोकरीचं स्वप्न बघू शकतं.

आर्थिक आणि सामाजिक परिणाम

स्टार्टअप कल्चरमुळे आजचा तरुण नोकरी मागणारा नाही, तर नोकरी देणारा बनतोय. ONDC, UPI, DBT मुळे भ्रष्टाचाराला आळा बसला. शेतमाल थेट ग्राहकापर्यंत पोहोचतोय. पण दुसरी बाजूही आहे-AIमुळे अनेक नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत. डीपफेक, सायबर फ्रॉड, डेटा प्रायव्हसी हे नवे प्रश्न उभे राहिले आहेत. मोबाईलच्या व्यसनाने मानसिक आरोग्यावर परिणाम होतोय.


**भारताची झेप**

डिजिटल इंडियामुळे आज भारत फिनटेकमध्ये जगात नंबर एकवर झाली आहे. चंद्रयान-३, आदित्य-L१ने अवकाशात आपला झेंडा रोवला आहे. सेमीकंडक्टर मिशन, AI मिशनमुळे भारत 'मेक इन इंडिया' ते 'मेक फॉर वर्ल्ड'कडे वाटचाल करीत आहे. ५G नंतर आता ६G वर जोरदारपणे काम सुरू झाले आहे, पण अजूनही ग्रामीण आणि शहरी भागातली डिजिटल दरी ही एक प्रकारचे आव्हानच बनले आहे.

पुढची १० वर्षे AI, क्वांटम कॉम्प्युटिंग, बायोटेक आणि ग्रीन हायड्रोजनची असणार आहेत. ड्रायव्हरलेस कार, ह्यूमनॉइड रोबोट, मेटाव्हर्स ऑफिस हे स्वप्न राहणार नाही. दरम्यान, तंत्रज्ञान कितीही पुढे गेलं तरी माणूस व माणुसकी केंद्रस्थानी राहिली पाहिजे. कारण शेवटी तंत्रज्ञान हे साधन आहे, साध्य नाही.

# लेखक, नाटककार, पत्रकार जयवंत दळवी

## निमित्त



जयवंत द्वारकानाथ दळवी हे मराठी लेखक, नाटककार, पत्रकार होते. त्यांचा जन्म १४ ऑगस्ट १९२५ रोजी गोव्यातील हडफडे येथे झाला. ते मूळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील आरवली गावचे. त्यांनी जवळच्या शिरोडा गावी पाचवीपर्यंतचे शिक्षण घेतले. मॅट्रिक झाल्यावर मुंबईच्या व्हीजेटीआयमध्ये टेक्स्टाईल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा घेण्यासाठी अभ्यास करू लागले, पण डिप्लोमा अर्धवट टाकून मुंबईच्या 'प्रभात' दैनिकात ते रुजू झाले.

'प्रभात'मधून दळवी 'लोकमान्य'मध्ये गेले. एमएसाठी त्यांनी 'इमोशन अ‍ॅन्ड इमॅजिनेशन अ‍ॅण्ड देअर प्लेस इन लिटरेचर' या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला. अमेरिकन सरकारच्या मुंबई येथील माहिती खात्यात (युसिस) त्यांनी नोकरी स्वीकारली. लेखनासाठी पूर्ण वेळ मिळावा म्हणून त्यांनी वयाच्या पन्नासाव्या वर्षी १९७५ साली स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. साहित्यक्षेत्राला विनोदी फटके लगावणारा 'ठणठणपाळ' या टोपण नावानेही त्यांनी लेखन केले.


बालपणी त्यांच्यावर राष्ट्र सेवा दलाचे संस्कार झाले होते. श्रमदान मोहिमेत ते उत्साहाने भाग घेत. त्यांची पहिली कथा 'दातार मास्तर' १९४८मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर त्यांच्या लेखणीला बहर आला आणि विविध साहित्य प्रकार त्यांनी समर्थपणे हाताळले. 'गहिवर' (१९५६), 'एदीन' (१९५८), 'रुक्मिणी' (१९६५), 'स्पर्श' (१९७४) आदी १५ कथासंग्रह; 'चक्र' (१९६३), 'स्वगत' (१९६८), 'महानंदा' (१९७०), 'अथांग' (१९७७), 'अल्बम' (१९८३) आदी २१ कादंबर्या; 'संध्याछाया' (१९७४), 'बॅरिस्टर' (१९७७), 'सूर्यास्त' (१९७८), 'महासागर' (१९८०), 'पुरुष' (१९८३), 'नातीगोती' (१९९१) आदी १९ नाटके दळवींनी लिहिली.

'लोक आणि लौकिक' हे प्रवासवर्णन आणि 'सारे प्रवासी घडीचे' हे कोकणातील विलक्षण व्यक्तींचे आणि त्यांच्या जगावेगळ्या कर्तृत्वाचे, विक्षिप्तपणाचे चित्रण करणारे विनोदी पुस्तक वाचकप्रिय ठरले. माणसांची दु:खे आणि त्यामागल्या दडपल्या गेलेल्या भावना हे दळवींच्या लेखनाचे सूत्र होते. अशा या प्रतिभावान लेखकाचे १६ सप्टेंबर १९९४ रोजी निधन झाले.

जयवंत दळवी माणसात रमणारे असले तरी वृत्तीने एकाकी होते. महाराष्ट्र शासनाचे, नाट्य परिषदेचे अनेक पुरस्कार त्यांना लाभले होते, पण गर्दीपासून ते दूर राहिले. सभा-संमेलने टाळली. अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी नाकारले होते. जयवंत दळवी चतुरस्त्र प्रतिभेचे लेखक होते. मराठी साहित्याला त्यांनी दिलेले योगदान फार महत्त्वाचे आहे.

'ठणठणपाळ'विषयी ज्ञानपीठकार कविवर्य विंदा करंदीकरांनी म्हटले आहे की, ठणठणपाळच्या भूमिकेतून दळवींनी केलेल्या लिखाणाला व कार्याला तोड नाही. इतकी जागरूकता, इतके शहाणपण, इतका जिव्हाळा आणि परखडपणा मराठी समीक्षात्मक विभागाला अजूनपर्यंत लाभलेला नव्हता. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पोक काढून बसायची सवय बिघडवते पोश्चर

पाठीला पोक काढून बसण्याची सवय म्हणजेच वाकून बसण्याची सवय. पाठीचा कणा वाकवायचा त्याला वळण द्यायचे आणि खांदे पुढे झुकवून बसायचे. ही अनेकांची दैनंदिन सवय झाली आहे. ऑफिसमध्ये दीर्घकाळ लॅपटॉपसमोर बसणे, मोबाईल हातात घेऊन तासनतास स्क्रोल करत राहणे किंवा आरामात सोफ्यावर बसून काम करणे या सर्वांमुळे ही सवय नकळत लागते. सुरुवातीला ही बसण्याची पद्धत अगदी सोयीची आणि आरामदायी वाटते. पाठीला बरे वाटते, पण हळूहळू ती शरीराच्या नैसर्गिक पोश्चरवर परिणाम करू लागते आणि आरोग्यावर गंभीर दुष्परिणामही करते.



सतत पाठीला पोक काढून बसल्याने कण्याचा नैसर्गिक आकार बिघडतो. मणक्यांवर ताण येतो ते आपल्याला जाणवतही नाही. हळूहळू दबाव वाढतो.या दबावामुळे मणक्याचे भाग झिजण्याचा वेग वाढतो. ज्यामुळे दीर्घकालीन पाठदुखी, सायटिका, मानदुखी आदी सारख्या समस्या उद्भवू शकतात. पाठीच्या वरच्या भागातील स्नायूंना सतत ताण येतो आणि खालच्या पाठीचे स्नायू कमकुवत होतात. खांदे पुढे वाकल्यामुळे खांद्यांमध्ये स्टिफनेस येतो. तर मान सतत पुढे राहिल्याने टेक्स्ट नेक सारखी समस्या वाढू शकते. या स्थितीमुळे डोकेदुखी, मानदुखी आणि खांदेदुखी वारंवार जाणवू शकते.

चुकीच्या बसण्यामुळे फक्त हाडे आणि स्नायूच नव्हे, तर शरीरातील इतर कार्यप्रणालीवरही परिणाम होतो. पाठ वाकवून बसल्याने छातीचा पिंजरा पूर्णपणे फैलावत नाही, त्यामुळे श्वसनाची क्षमता घटते. फुफ्फुसांना कमी हवा मिळाल्याने ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो आणि त्यामुळे थकवा, एकाग्रतेत घट आणि झोपेची गुणवत्ता कमी होऊ शकते. दीर्घकाळ चुकीच्या पोश्चरमुळे पचनक्रियेवरही परिणाम होतो, कारण पोटावर दाब आल्यामुळे अन्न नीट पचत नाही आणि ॲसिडिटी, अपचन अशा समस्या वाढतात.

पोक काढून बसण्याची सवय वाटते तेवढी साधी नाही. फक्त काही साधे त्रास होतात असे नाही पोक काढून बसण्याची सवय असल्यामुळे माणूस वया नुसार जसा मोठा होतो तसा त्याचा पाठीचा मणका कमकुवत होत जातो. म्हातारपणात पाठीला कुबड येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे बसताना वाकडे तिकडे बसणे टाळा आणि स्वस्थ ताठ बसायची सवय लावून घ्या.

# कोकण रेल्वे भारतीय रेल्वेत विलीन होण्याचा मार्ग मोकळा

## दुपदरीकरणाला मिळणार गती; प्रवाशांच्या सुविधांमध्येही होणार मोठी सुधारणा



**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणच्या विकासाची जीवनवाहिनी असलेल्या कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेमध्ये विलीनीकरण करण्याच्या मागणीला आता निर्णायक वळण मिळाले आहे. कोकण रेल्वे महामंडळ आर्थिक अडचणींमुळे मर्यादित निधीत काम करत असल्याने मार्गाचे दुपदरीकरण, नवीन स्थानके, सुरक्षा व्यवस्था, अतिरिक्त गाड्या आणि अन्य पायाभूत सुविधांच्या विकासाला अपेक्षित वेग मिळत नाही. त्यामुळे कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेत विलीनीकरण करून या मार्गाला केंद्राच्या रेल्वे अर्थसंकल्पातून थेट निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे.

या मागणीला राजकीय पातळीवरही मोठा पाठिंबा मिळाला आहे. रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी लोकसभेत कोकण रेल्वेच्या विलीनीकरणाचा मुद्दा जोरदारपणे मांडत दुपदरीकरणासाठी केंद्राने भरीव निधी द्यावा, अशी मागणी केली होती. कोकणातील लाखो प्रवाशांच्या दैनंदिन अडचणी, रेल्वे गाड्यांची मर्यादित संख्या आणि वाढती प्रवासी व मालवाहतूक लक्षात घेता कोकण रेल्वेला स्वतंत्र महामंडळाच्या चौकटीत न ठेवता भारतीय रेल्वेच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विधानसभेत कोकण रेल्वेच्या भारतीय रेल्वेत विलीनीकरणास महाराष्ट्र सरकारचा पाठिंबा असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने केंद्राकडे यासंदर्भातील प्रस्ताव पाठविला.

महाराष्ट्राच्या संमतीबरोबरच कर्नाटक, गोवा आणि केरळ या राज्यांचीही भूमिका या प्रक्रियेत महत्त्वाची ठरली आहे. महाराष्ट्राच्या संमतीमध्ये राज्याने कोकण रेल्वे कॉर्पोरेशनमध्ये केलेल्या आर्थिक सहभागाची परतफेड आणि विलीनीकरणानंतरही 'कोकण रेल्वे' हे ऐतिहासिक नाव कायम ठेवण्याची अट नमूद करण्यात आली आहे. कोकण रेल्वेचा मार्ग सुमारे ७४० किलोमीटरचा असला तरी त्यातील मोठा भाग अद्याप एकेरी मार्गावर आहे. त्यामुळे एका गाडीला मार्ग मिळण्यासाठी दुसऱ्या गाडीला क्रॉसिंग स्टेशनवर थांबावे लागते. परिणामी गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होतो आणि सणासुदीच्या काळात प्रवाशांची मोठी गैरसोय होते.

मार्गाचे टप्प्याटप्प्याने दुपदरीकरण झाले, तर अधिक गाड्या चालविणे, वेळापत्रक सुधारणा करणे आणि प्रवासाचा वेळ कमी करणे शक्य होणार आहे. त्यासाठी हजारो कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे. भारतीय रेल्वेत विलीनीकरण झाल्यास या पायाभूत सुविधांसाठी केंद्राकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे यांसह देशाच्या विविध भागांत कामानिमित्त राहणाऱ्या कोकणातील चाकरमान्यांसाठी कोकण रेल्वे अत्यंत महत्त्वाची आहे. गणेशोत्सव, होळी, दिवाळी तसेच उन्हाळ्याच्या सुट्टीत कोकणाकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. मात्र मर्यादित मार्गक्षमता आणि गाड्यांची संख्या यामुळे आरक्षणाचा प्रश्न, गर्दी आणि विलंब या समस्या वारंवार निर्माण होतात. विलीनीकरणानंतर नवीन गाड्यांना मंजुरी, अतिरिक्त फेऱ्या, स्थानकांचा विकास, सुरक्षा उपाययोजना आणि दुपदरीकरण यांना अधिक वेग मिळण्याची अपेक्षा आहे.

विलीनीकरणाच्या प्रक्रियेत कोकणवासीयांच्या भावनिक जिव्हाळ्याचा विषय असलेले 'कोकण रेल्वे' हे नाव कायम ठेवण्याची मागणी महाराष्ट्राने केली आहे. राज्याच्या संमतीतील ही प्रमुख अट असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे भारतीय रेल्वेच्या अखत्यारित आल्यानंतरही या ऐतिहासिक रेल्वेमार्गाची स्वतंत्र ओळख आणि 'कोकण रेल्वे' हे नाव जपले जाण्याची शक्यता आहे.

कोकण रेल्वेच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव केंद्राकडे गेल्यानंतर आता अंतिम निर्णयाची प्रतीक्षा आहे. कोकण रेल्वे भारतीय रेल्वेत विलीन झाल्यास केवळ प्रशासनिक बदल होणार नाही, तर कोकणच्या रेल्वे विकासासाठी निधीची उपलब्धता, दुपदरीकरण, नवीन गाड्या, स्थानकांचा विकास आणि प्रवाशांच्या सुविधांमध्ये मोठी सुधारणा होण्याचा मार्ग खुला होऊ शकतो.

# मुरूड यशवंतनगर पंचक्रोशीत भव्य तिरंगा रॅली



**मुरुड : प्रतिनिधी**

देशभरात १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी तिरंगा रॅलीचे आयोजन केले जात असून मुरुड तालुक्यातील नांदगाव,माजगाव, उसरोली या पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या उत्साहात भव्य तिरंगा रॅली काढली.

नांदगावच्या श्री सिद्धिविनायक मंदिरापासून निघालेल्या या रॅलीत येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील विद्यार्थीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.हातात तिरंगा घेऊन भारतमाता की जय, वंदे मातरम्, जय जवान जय किसान आदी घोषणा देत तसेच ऐ मेरे वतनके लोगो , दिल दिया है जान भी देंगे ऐ वतन तेरे लिये,जय हो अशा अनेक देशभक्तीपर गीतांनी यावेळी वातावरण भारावून गेले होते.

नांदगावच्या सरपंच सेजलताई घुमकर , उपसरपंच मेघा मापगावकर , यशवंतनगर विद्यालयाचेपर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर,शिक्षक शिक्षिका,माजी सरपंच अस्लम हलडे,विद्याधर चोरघे, गणेश गाणार, सचिन पाटील, योगेंद्र गोयजी,योगेश जैस्वाल,शादाब सरडे,सिराज दखनी, ग्रामपंचायतीचे आजी माजी सदस्य,माजी शिक्षक शिक्षिका, नांदगाव मजगाव,खारिकवाडा , उसरोली,वाळवटी आदी गावातील हिंदू , मुस्लिम नागरिकांसह व्यापारी, दुकानदार तथा महिलाही रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली यावेळी पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.मजगाव येथून फिरून आल्यानंतर उसरोली टेप येथे रॅलीची सांगता झाली.

# नेरळ, ममदापूर, दामत, शेलू ग्रामपंचायतीमधील महिलांनी जागवली 'उमेद'



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ, ममदापुर, शेलू आणि दामत या चार ग्रामपंचायत मधील महिला बचत गटांनी आपल्या बचत गटांच्या माध्यमातून लघु उद्योग उभारत रोजगार निर्मिती केली आहे. भरारी महिला प्रभाग संघांनी ३० महिला ग्रामसंघ यांच्या माध्यमातून जवळपास ३००० महिलांना एकत्र करीत बचत गट चालवले आहेत. या बचतगटांनी अनेक लघु उधोग यांच्या माध्यमातून कराडचे कर्ज मिळवून व्यवसाय उभे केले आहेत. त्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभेत या महिला प्रभागसंघाची भरारी आणि उमेद दिसून आल्याचे पाहुण्यांनी कौतुकाने स्पष्ट केल्याचे दिसून आले.

ग्रामविकास व पंचायत राज विभाग, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, तालुका अभियान व्यवस्थापक कक्ष पंचायत समिती कर्जत अंतर्गत 'भरारी महिला प्रभागसंघ नेरळ' यांची वार्षिक सर्वसाधारण सभा नेरळ गावातील बापूराव धारप सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनज्योती अभियानाच्या कर्जत तालुका व्यवस्थापक निशा आवस्कर, सह व्यवस्थापक अविनाश जाधव, पंचायत समिती मधील व्यवबस्थापक राम नेमाडे यांच्यासह भरारी महिला प्रभाग संघाच्या पदाधिकारी अध्यक्षा वर्षा बोराडे, उपाध्यक्ष संगीता गवळी, कोषाध्यक्ष अंकिता मोरे आणि प्रभाग सामनावयक तसेच नेरळ ग्रामपंचायती ग्राम पंचायत अधिकारी अरुण कार्ले आदी मान्यवर उपस्थित होते. माजी सभापती आणि ग्रामसंघाच्या अध्यक्षा आरती भगत यांनी वार्षिक अहवाल सादर केला तर स्वागत गीत रेशमा भवारे यांनी तर उमेद गीत तालुका सामनावयक रेखा हिरेमठ यांनी सादर केले तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन आसावरी काळे यांनी केले.

या सर्वसाधारण सभेला व स्नेहमेळाव्यास परिसरातील महिला बचत गटांच्या सदस्या व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. सभागृह महिलांच्या उपस्थितीने पूर्णपणे भरून गेले होते. सर्वसाधारण सभेत प्रभागसंघाच्या वर्षभरातील कामांचा आढावा, आर्थिक ताळेबंद, महिला सक्षमीकरणाच्या विविध योजना, तसेच बचत गटांच्या पुढील वाटचालीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रसंगी महिलांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी उमेद अभियानांतर्गत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्य सुनीता मोरे यांनी महिला साधन व्यक्तींचे प्रश्न जिल्हा परिषद मध्ये मांडले जातील. तर महिला बचत गटासाठी एकदिवसाचे प्रशिक्षण सझिबिर आयोजित केले जाईल .

# श्रीवर्धनमध्ये अखंड भारत संकल्प अभियान दिवस



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरातील दाबक पाखाडी येथील क्षत्रिय माळी समाजाच्या हॉलमध्ये अखंड भारत संकल्प अभियान दिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन सकल हिंदू समाजातर्फे करण्यात आले होते.

१९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला. पण याच वेळी अखंड असलेल्या भारताचे दोन तुकडे झाले. धर्माच्या आधारावरती पाकिस्तान या देशाची इस्लामिक देश म्हणून फाळणी करण्यात आली. ही फाळणी इतक्या अचानक पणे करण्यात आली की, पाकिस्तान मध्ये राहणाऱ्या हिंदूंना स्वतंत्र झालेल्या भारतामध्ये विस्थापित म्हणून यावे लागले. तर लाखो लोकांना आपले जीव गमवावे लागले.

स्त्रियांवरती प्रचंड अत्याचावर झाले.आपली मूळ असलेली घरे, जमीन, शेती हे सर्व सोडून अनेक विस्थापित आश्रयाला भारतामध्ये आले. या अगोदर देखील अखंड भारताचे अनेक वेळा तुकडे झाले होते. अफगाणिस्तान हे वेगळे राष्ट्र निर्माण करण्यात आले होते. नेपाळ भारतापासून वेगळा झाला होता. तर ब्रह्मदेश हा देखील भारतापासून वेगळा झाला होता. पुन्हा एकदा तुकडे झालेला भारत देश एकत्र व्हावा. ही सर्व भारतीयांची इच्छा आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन तरुण व तरुणी यांची उपस्थिती खूप मोठ्या प्रमाणात होती.

सर्वप्रथम उपस्थित तरुणांना श्रेयस पेंडसे यांनी मार्गदर्शन केले व त्यानंतर विभाजन की विभिषिका ही चित्रफीत त्या ठिकाणी दाखवण्यात आली.

# रायगडात ३१ ग्राहकांकडून ५२ हजार युनिटची वीजचोरी उघड

**अलिबाग : प्रतिनिधी**

वीजबिल न भरता अनधिकृतपणे वीज वापरणाऱ्यांविरोधात महावितरणने आता कारवाईचा धडाका सुरू केला आहे. रायगड जिल्हयातील कर्जत आणि खालापूर तालुक्यात राबवण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत तब्बल ३१ ग्राहकांकडून सुमारे ५२ हजार युनिटची वीजचोरी उघडकीस आली आहे..

भांडुप परिमंडलाच्या वतीने वीजचोरीला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून ७ आणि ८ ऑगस्ट रोजी कर्जत व खालापूर तालुक्यातील वीज जोडण्यांची तपासणी करण्यात आली. खोपोली आणि कर्जत उपविभागातील विविध ठिकाणी विशेष पथकांनी अचानक तपासणी करत वीज वापराची पाहणी केली.

या कारवाईदरम्यान विशेषतः हॉटेल्स, फार्म हाऊस तसेच इतर वीज ग्राहकांच्या जोडण्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये मीटरमध्ये फेरफार, अनधिकृत जोडणी अथवा अन्य मार्गाने वीजचोरी होत असल्याचे आढळून आलेल्या ३१ ग्राहकांविरोधात भारतीय विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात आली.

ही कारवाई मुख्य अभियंता, भांडुप परिमंडल संजय पाटील आणि अधीक्षक अभियंता, पेण मंडळ धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पनवेल ग्रामीण विभागात विशेष वीजचोरीविरोधी पथके तयार करण्यात आली असून, या पथकांच्या माध्यमातून संशयित वीज जोडण्यांवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

# चौक येथे नेत्रतपासणी शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

शांतिलाल संघवी आय इन्स्टिट्युट, मुंबई,सरनोबत नेताजी पालकर व्यापारी सामाजिक संस्था चौक व सरनोबत नेताजी पालकर व्यापारी महिला संघटना यांच्या सहयोगाने चौक येथे नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

सुदर्शन मोफत मोतिबिंदू आणि संपूर्ण नेत्र रोग निदान हे शिबिर चौक तुपगाव रस्त्यावरील द्वारकामाई कॉम्प्लेक्स हॉटेल गावरान लज्जत येथे पार पडले. संपूर्ण शिबिरात कम्प्यूटराइज्ड दृष्टि चाचणी,कम्प्यूटराइज्ड नेत्र दबाव चाचणी,शुगर आणि बी पी चाचणी,मोतीबिंदूची चाचणी,डायबेटिक रेटिनोपॅथी चाचणी,चष्म्याच्या नंबरची चाचणी सर्व वयोगटातील लोकांची करण्यात आली.डोळ्यांची किंवा रेटिनाची कोणतीही शस्त्रक्रिया झाली असेल त्यांनीही चाचणी करून घेतली. यावेळी नेत्र संबंधित मधुमेह, उच्च रक्तदाब, किंवा इतर मुख्य आजारांची निदान पूर्ण तपासणी करण्यात आली.

शांतिलाल संघवी आय इन्स्टिटयूट येथे ज्यांना नेत्र शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे, त्यांची नाव नोंदणी करून त्यांच्यावर मोफत उपचार करण्यात येणार आहेत. नेत्र रुग्णांना मोतिबिंदू शस्त्रक्रिया, वाहन सुविधा, राहणे, जेवण हे सर्व निःशुल्क करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# अलिबागेत संत नामदेव महाराज समाधी सोहळा साजरा



**अलिबाग : प्रतिनिधी**

श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा ६७६ वा संजीवन समाधी सोहळा अलिबाग येथे साजरा करण्यात आला.नामदेव महाराजांच्या मूर्तीचे पूजन विलास डोळस व नीता डोळस या उभयतांच्या हस्ते झाले.

अलिबाग मधील संत नामदेव शिंपी समाज मंडळाने यावर्षी ११ ऑगस्ट रोजी हा संजीवन समाधी सोहळा साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला धार्मिक विधी पार पडले. श्री संत नामदेव महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन करण्यात आले. समाज मंडळाची वार्षीक सर्व साधारण शरद प्रभाकर हेंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

दुपारच्या सत्रात बालवाडी ते इ.दहावी, बारावी,पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुरस्कारांचे वितरण करण्यात आले .आदर्श शिक्षीका पुरस्कार प्राप्त नीता डोळस यांना सेक्रेटरी सूचीता ढवळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा विषेश सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपाध्यक्ष भवेष लिमकर,सर्वश्री शशिकांत पोरे, विनायक शिंपी, नंदकुमार डोळस, सचिन ढवळे, जगदिश राऊत,जीवन मुद्राळे यांनी आपले विचार मांडले. कार्यकारिणी सदस्य सर्वश्री अजित माळवदे,नील राऊत, मितेश पिंपळकर, भारत मुद्राळे, प्रभा गंधारे उपस्थित होते. खजिनदार किशोर राऊत यांनी जमा खर्च सादर केला.

**चौक : आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त 'पुष्पगुच्छ व बॅनरबाजी न करता गरजू व रुग्णांना मदत करा' या आवाहनाला खालापूर तालुक्यातून कृतिशील प्रतिसाद मिळाला आहे. तुपगाव येथील गर्भाशयाच्या कर्करोगाशी झुंज देणाऱ्या भगिनी निशा रवींद्र पाटील (बिरवाडकर) यांना उपचारासाठी वडगाव पंचायत समितीचे अध्यक्ष विनोद भोई यांच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली. भारतीय जनता पक्ष खालापूरचे आरोग्यदूत विजय ठोसर यांनी यासाठी सहकार्य केले.**




**परिशिष्ट क्र. १६**

(उपविधी क्र. ३५ अन्वये)

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**

**नोटीस**

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत/भूखंडावर/ गाळा/ बंगला क्र................ ....धारण करणाऱ्या **श्रीमती प्रमिला श्रावण भातणकर** यांचे तारीख ०५/०८/२०२६ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस / हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२.०० वा. ते दुपारी ४.०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल.
दिनांक : १२/०८/२०२६

**सही/-**
**सचिव**
सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नवीन पनवेल



**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **लतिका कृष्णा पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सारडे (५५३३४३)**
(PU-ID : 34767162863), **तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ११२/१ खाते क. ८९ | १ | ०.२३.६० पो.ख. ०.०१.०० **एकुण ०.२४.६०** | ५.३८ |
| **एकुण ०.२४.६० गुंठ्याचे खरेदीखत** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

# एपीएमसीला मिळणार राष्ट्रीय दर्जा

## वर्षभरात डिजिटल कामकाजाचे पणनमंत्र्यांचे निर्देश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे राष्ट्रीय स्तरावरील महत्त्व लक्षात घेऊन तिच्या पायाभूत सुविधांसह कामकाजातही आवश्यक सुधारणा करून राष्ट्रीय दर्जाचा बाजार विकसित करण्याच्या दृष्टीने वेगाने काम करण्याचे निर्देश पणनमंत्री तथा बाजार समितीचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी बुधवारी दिले.



बाजार समितीचे संपूर्ण कामकाज पुढील वर्षभरात मोठ्या प्रमाणावर डिजिटल आणि शक्य तितके रोखरहित करण्याचे उद्दिष्टही त्यांनी निश्चित केले. रावल यांनी बाजार समितीच्या विविध आवारांची प्रत्यक्ष पाहणी करून व्यापारी, कामगार आणि अन्य घटकांशी संवाद साधला. त्यानंतर झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी बाजारातील सुविधांचा आढावा घेतला. बाजाराची नियमित स्वच्छता, शौचालये, महिलांसाठी स्वतंत्र शौचालये, पिण्याचे पाणी, प्रकाश व्यवस्था आणि सौर दिवे यांसारख्या मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

कांदा-बटाटा बाजारातील जुन्या इमारतींच्या सद्यस्थितीचा आणि सुरक्षिततेचा प्रश्नही बैठकीत चर्चेत आला. आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती, पुनर्बांधणी अथवा पर्यायी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना रावल यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. जुन्या इमारतींमध्ये गळती असल्यास ती तातडीने थांबवून आवश्यक दुरुस्ती करावी आणि इमारतींची सुरक्षितता सुनिश्चित करावी, असेही त्यांनी सांगितले.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विकसित होणाऱ्या अनेक व्यवस्था आणि पद्धतींचे अनुकरण देशातील इतर बाजार समित्यांकडून केले जाते. त्यामुळे या बाजाराचा विकास केवळ स्थानिक गरजांपुरता मर्यादित न ठेवता राष्ट्रीय बाजारपेठेच्या दर्जानुसार करणे आवश्यक असल्याचे रावल यांनी स्पष्ट केले.

शेतकरी आणि व्यापाऱ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्यास बाजारातील व्यवहार वाढतील आणि त्याचा लाभ शेतकऱ्यांनाही होईल, असे त्यांनी नमूद केले. बाजारात येणाऱ्या वाहनांच्या प्रवेशापासून मालाची नोंद, मोजणी, शुल्क भरणा आणि अन्य आर्थिक व्यवहार डिजिटल करण्याची एकात्मिक व्यवस्था उभारण्यात येणार आहे. वाहनांना जलद प्रवेश, ओळखपत्र अथवा कार्डद्वारे शुल्कवसुली, मालाची डिजिटल नोंद आणि ऑनलाइन आर्थिक व्यवहार या सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. यासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ आणि संबंधित संस्थांचे सहकार्य घेण्यात येईल, असे रावल यांनी सांगितले.

बाजार समितीतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची रिक्त पदे पारदर्शक पद्धतीने भरण्यात येणार असून कृषी, माहिती तंत्रज्ञान, वित्त आणि कायदा क्षेत्रातील कौशल्यपूर्ण मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. नियमित भरती होईपर्यंत अनुभवी व्यक्ती करार पद्धतीने घेण्याचा विचार आहे. कामात दिरंगाई किंवा शिस्तभंग खपवून घेतला जाणार नसल्याचा इशाराही रावल यांनी दिला. मंत्री रावल यांनी मसाला, धान्य, भाजीपाला, फळ तसेच कांदा-बटाटा बाजार आवारांची पाहणी केली. लोडिंग-अनलोडिंगच्या वेळेशिवाय बाजार परिसरात वाहनांचे पार्किंग होऊ देऊ नये, अनधिकृत वाहने तातडीने हटवून वाहतूक सुरळीत ठेवावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

स्वच्छतेच्या कामात हलगर्जी आढळल्यास संबंधित कंत्राटदार आणि यंत्रणेची जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. आढावा बैठकीस वखार महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कौस्तुभ दिवेगावकर, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, बाजार समितीचे सचिव शरद जरे, आमदार शशिकांत शिंदे, माजी सभापती शंकरराव पिंगळे यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी आणि व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# नवी मुंबईतील सरकारी कॅन्टीनला `अच्छे दिन`

## तुकाराम मुंढे इम्पॅक्ट, कोकण भवनला नवा लूक

**नवी मुंबई : बातमीदार**

"प्रशासकीय व्यवस्था ही व्यक्तीसापेक्ष नसते" असा सर्वसाधारण समज असला तरी अन्न व औषध प्रशासन आयुक्त व कडक शिस्तीचे अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय प्रभावामुळे हा समज चुकीचा ठरताना दिसत आहे. नवी मुंबईतील प्रमुख सरकारी कार्यालयांच्या कॅन्टीनचे चित्र आता बदलू लागले असून सरकारी उपाहारगृहांना खऱ्या अर्थाने 'अच्छे दिन' आल्याचे पाहायला मिळत आहे.



'सजग नागरिक मंच'च्या सदस्यांनी नुकतीच कोकण भवन, बचत धाम आणि सिडको येथील सरकारी कॅन्टीनला भेट देऊन पाहणी केली असता तेथील व्यवस्थेत आणि स्वच्छतेत आमूलाग्र सकारात्मक बदल झाल्याचे निदर्शनास आले. नवी मुंबईतील मध्यवर्ती शासकीय केंद्र असलेल्या कोकण भवन इमारतीत अनेक महत्त्वाची कार्यालये आहेत. गेल्या दोन वर्षांत या इमारतीतील बहुतांश कार्यालयांचे अंतर्गत नूतनीकरण झाले होते; मात्र कर्मचाऱ्यांच्या आणि नागरिकांच्या पोटाची सोय करणाऱ्या कॅन्टीनकडे प्रशासनाच्या दुय्यम दृष्टिकोनामुळे प्रदीर्घ काळापासून दुर्लक्ष झाले होते, परंतु आता तुकाराम मुंढे इफेक्टमुळे कोकण भवनच्या पहिल्या मजल्यावरील कॅन्टीन पूर्णपणे नटले आहे.

कोकण भवन कॅन्टीनचे रूपडे पूर्णतः बदललेले दिसत आहे. संपूर्ण कॅन्टीनची स्वच्छता करून नवीन रंगकाम करण्यात आले आहे. किचनमध्ये टाईल्स बसवून स्वच्छता मानकांचे पालन केले जात आहे. स्वयंपाकघरात बाहेरील व्यक्तींना प्रवेशबंदी, स्वयंपाकघरात येताना पायत्राणे बाहेर काढणे, पिण्याचे शुद्ध पाणी मोफत उपलब्ध, अन्नपदार्थ फक्त रिफाइंड सनफ्लॉवर तेलामध्ये बनवण्याबाबत स्पष्ट सूचनांचे फलक लावले गेले आहेत. शुद्ध पिण्याचे मोफत पाणी, नवीन वॉटर कुलर व प्युरिफायर, शाकाहारी व मांसाहारी पदार्थांसाठी स्वतंत्र काउंटर तसेच स्वयंपाकाच्या साहित्यासाठी स्वतंत्र सुरक्षित भांडारगृह अशा सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

शासकीय कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या 'बचत धाम' येथील उपाहारगृह व विश्रामगृहाचेही सुशोभीकरण करण्यात आले आहे. कोकण भवनपाठोपाठ सिडको व रायगड भवन येथील उपाहारगृहांच्या नूतनीकरणाचे कामही वेगाने सुरू झाले आहे. या दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी सिडको भवन व रायगड भवन येथील उपाहारगृह दिनांक १२ ते २३ ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. काम पूर्ण होईपर्यंत नागरिकांनी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून लावलेल्या अधिकृत सूचनेद्वारे करण्यात आले आहे.

# शिक्षणातूनच साधणार `विकसित भारत २०४७`चे स्वप्न!

## नवी मुंबईत तीन हजारहून अधिक विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हर घर तिरंगा उपक्रम आणि तिरंगा रॅली उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधानांच्या संकल्पनेतून आकारास आलेल्या 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत गुरुवारी (दि. १३) नवी मुंबईतील प्रभाग क्रमांक ६मध्ये देशभक्तीचा व शिक्षणाचा अभूतपूर्व उत्सव पाहायला मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत तसेच नवी मुंबईचे आमदार गणेश नाईक यांच्या विचारांनी प्रेरित होऊन शिक्षण, आरोग्य व पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे महापौर व लोकप्रतिनिधी सुधाकर सोनवणे यांच्या नेतृत्वात भव्य 'तिरंगा यात्रा व तिरंगा रॅली' अत्यंत दिमाखात आणि स्वयंशिस्तीत पार पडली.

उपक्रमाचा भाग म्हणून इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वरचित कविता लेखन, चारोळी, घोषवाक्य, चित्रकला आणि पोस्टर मेकिंग अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. 'सबका साथ, सबका विकास' या ब्रीदवाक्याला सार्थ ठरवत आयोजित करण्यात आलेल्या या तिरंगा रॅलीमध्ये पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, मान्यवर कांशीरामजी हिंदी विद्यालय (गौतम नगर), इंदिरा गांधी हिंदी विद्यालय आणि शारदा हिंदी विद्यालय या शाळांचे ३,०००हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांसोबतच प्रभागातील अंगणवाडी सेविका, बालवाडी शिक्षिका व मदतनीस, पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी, माता रमाई नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, स्वच्छतादूत, सर्वधर्मीय धार्मिक स्थळांचे पदाधिकारी, रिक्षा चालक-मालक संघटना, विविध सेवाभावी संस्था - मातोश्री अनुसया सोनवणे चॅरिटेबल ट्रस्ट, विश्व बालक केंद्र, क्राय, मॅजिक बस, ज्येष्ठ कार्यकर्ते, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' आणि 'हम सब एक हैं' या घोषणांनी संपूर्ण परिसर देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला होता. देशभक्तीपर गीते सुरू होताच हजारो उपस्थितांमध्ये एक वेगळेच चैतन्य निर्माण झाले.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना सुधाकर सोनवणे म्हणाले की, विकसित भारतासाठी दैनंदिन जीवनात छोट्या-छोट्या चांगल्या सवयी अंगीकारल्या पाहिजेत. घरोघरी तिरंग्यासोबतच 'घरोघरी शिक्षणाची ज्योत' पेटली पाहिजे. जिथे शिक्षण आहे, तिथे आपोआप स्वच्छता राहील आणि घराघरांतून 'स्वच्छता योद्धा' निर्माण होतील. आजचे विद्यार्थीच उद्याच्या विकसित भारताचे निर्माते आहेत.



# गव्हाण विद्यालयास माजी विद्यार्थी किशोर पाटील यांच्याकडून फ्रिज भेट

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर या विद्यालयातून आजपर्यंत अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत. आपल्या जडणघडणीत विद्यालयाचा असलेला मोलाचा वाटा जाणून अनेक माजी विद्यार्थी आजही विद्यालयाशी आपले ऋणानुबंध जपत आहेत. याच भावनेतून विद्यालयाचे माजी विद्यार्थी व कोपरगावचे सामाजिक कार्यकर्ते किशोर पाटील यांनी आपला सुपुत्र धैर्य किशोर पाटील याच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यालयास फ्रिजची सदिच्छा भेट दिली.



मंगळवारी (दि. ११) विद्यालयात स्थानिक स्कूल कमिटीची सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या निमित्ताने किशोर पाटील यांनी विद्यालयास ही उपयुक्त भेट प्रदान केली. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे व विद्यालयाप्रति असलेल्या आत्मीयतेचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, कॉलेज कमिटीचे चेअरमन वाय. टी. देशमुख, स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, विजयशेठ घरत, अॅड. राहुल घरत, विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, ग्रंथपाल महेश म्हात्रे, वरिष्ठ लेखनिक निलेश गोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्वांनी कुमार धैर्य किशोर पाटील यास वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा व आशीर्वाद दिले. विद्यालयाच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांकडून मिळणारे असे सहकार्य निश्चितच प्रेरणादायी असून ज्या विद्यालयाने आपल्याला घडविले, त्या विद्यालयासाठी काहीतरी देणे हीच खरी कृतज्ञता या भावनेचे किशोर पाटील यांनी आपल्या कृतीतून दर्शन घडविले.

# 'सीकेटी'त देशभक्तीपर उपक्रम, विद्यार्थी गुणगौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे देशाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विविध देशभक्तीपर उपक्रम आणि गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शाळांतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्यांसह तालुका, जिल्हा आणि राष्ट्रीय स्तरावर कला व क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि मेडल देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पनवेल महापालिकेच्या नगरसेविका डॉ. अस्मिता घरत, मोटिव्हेशनल स्पीकर गणेशसिंग राजपूत, पालक प्रतिनिधी संघाचे सदस्य नितीन पाटील, केसरी भोईर, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे तसेच माजी विद्यार्थिनी श्रावणी थळे, अनघा भोसले आणि स्नेहल कडव यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

# श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात दहावीच्या गुणवंतांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात सन २०२५-२६ वर्षातील इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या सोहळ्यानिमित्त इयत्ता दहावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी वर्षभर केलेल्या कामाचे कौतुक करण्यात आले. तसेच शिक्षणाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदनदेखील करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव सांगत इयत्ता दहावीचे वर्ष म्हणजे आयुष्याला कलाटणी देणारे वर्ष असे सांगितले. गुणगौरव सोहळ्याला अॅड. राहुल घरत (मेम्बर ज.भ.शि.प्र.संस्था), संतोष चव्हाण, चंद्रकांत घरत (चेअरमन श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय), सीमा घरत, सुनील पाटील, सर्व पालक प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करीत मार्गदर्शन केले.



# एमएनएम विद्यालयात विद्यार्थी नेतृत्वाचा पदग्रहण सोहळा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नियुक्त करण्यात आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचा पदग्रहण सोहळा बुधवारी (दि. १२) सकाळी ९.३० वाजता शाळेच्या परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त, जबाबदारीची जाणीव, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित करण्याच्या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत, प्रार्थनागीत व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य सादर करून कार्यक्रमात उत्साहाची भर घातली. यानंतर शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठी नियुक्त करण्यात आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींच्या पदांची घोषणा करण्यात आली. नवनियुक्त विद्यार्थी पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाची शपथ घेत जबाबदारी, शिस्त आणि विद्यालयाच्या नियमांचे पालन करण्याची प्रतिज्ञा केली.

यावेळी प्राचार्य सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच प्रमुख पाहुणे संतोष चव्हाण, राज्य मंडळ शाळा निरीक्षक, जे.बी.एस.पी. संस्था, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नेतृत्व हे केवळ पद नसून ती एक जबाबदारी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त, सहकार्य आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचा अंगीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संतोष चौहान यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निसर्गप्रेम, पर्यावरणाची जबाबदारी आणि हरित परिसराचे महत्त्व याची जाणीव करून देण्यात आली.

कार्यक्रमात हेड बॉय व हेड गर्ल यांनी मनोगत व्यक्त केले. वंदे मातरम्च्या सादरीकरणाने कार्यक्रमाची सांगता झाली. हा पदग्रहण सोहळा शिस्तबद्ध, दिमाखदार व संस्मरणीय ठरला.

# खोपोलीत हर घर तिरंगा रॅलीचा उत्साह

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षातर्फे आयोजित हर घर तिरंगा रॅलीला विद्यार्थ्यांसह सर्व स्तरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने खोपोली शहरात देशभक्तीमय वातावरण तयार झाले होते

भारतमाता की जय, वंदे मातरम या घोषणेने खोपोली बाजारपेठ दणाणून गेली. खालची खोपोली अग्निशामक केंद्राच्या जवळ हर घर तिरंगा रॅलीला प्रारंभ झाला, देशभक्तीमय घोषणा देण्यात येत होत्या, या रॅलीच्या अग्रभागी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खोपोली उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, रमेश मुंडे, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, ज्येष्ठ नेते किरण ठाकरे, खोपोली मंडळ



अध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विकास नाईक, विनायक माडपे, महिला मोर्चा अध्यक्षा व नगरसेविका अश्विनी आत्रे, परिवहन सभापती किशोर पाटील, नियोजन सभापती प्रतीक्षा रेटरेकर, नगरसेविका सानिया शेख, ज्येष्ठ नेते मनीष खवळे, संजय त्यांना, सूर्यकांत देशमुख, ज्येष्ठ नागरिक सभेचे अध्यक्ष रवींद्र घोडके, हास्य क्लब चे बाबूभाई ओसवाल, विशू परषदेचे रवींद्र जैन, भावेश लोखंडे, मयूर रेटरेकर, नगरी पालिका शिक्षण मंडळाच्या विविध शाळातील विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅलीची समाप्ती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील प्रांगणात झाली. यावेळी अविनाश कोळी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण घालून अभिवादन केले त्यानंतर त्यांनी रॅलीला संबोधित केले. हर घर तिरंगा रॅलीला उस्फुर्त प्रतिसाद दिल्याबद्दल प्रारंभिक अविनाश कोळी यांनी उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले तसेच भारताच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वांना मनापासून त्यांनी शुभेच्छा दिल्या.

सभेचे सूत्रसंचालन अजय इंगुलकर यांनी केले त्यानंतर उपस्थित माजी सैनिक यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

# महाड, माणगाव ,पोलादपूर मार्गावर विशेष एसटी गाड्यांना मंजुरी

## मंत्री भरत गोगावले यांच्या पाठपुराव्याला यश

**माणगाव : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मुंबई, ठाणे, पुणे आणि राज्याच्या विविध भागांतून कोकणातील आपल्या गावी परतणाऱ्या लाखो चाकरमान्यांसाठी यंदाचा प्रवास अधिक सुखकर होण्याची चिन्हे आहेत. गणेशोत्सव काळात कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन महाड, माणगाव,पोलादपूर मार्गावर विशेष एसटी गाड्या सोडण्यास मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या रायगडसह कोकणातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची मोठी गर्दी लक्षात घेता १२ सप्टेंबर रोजी रात्री विशेष एसटी गाड्या सोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे नियमित रेल्वे व एसटी गाड्यांवरील प्रवाशांचा ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.

महाड, माणगाव आणि पोलादपूर हे कोकणातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहेत. या मार्गावर विशेष एसटी सेवा वाढल्याने पुढील



प्रवासासाठीही नागरिकांना अधिक चांगली सुविधा मिळण्याची अपेक्षा आहे.विशेष एसटी गाड्यांमुळे अनेक कुटुंबांना खासगी वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होणार असून, प्रवासातील गर्दी, वाहनांचा ताण आणि वेळेची गैरसोय कमी करण्यास मदत होणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांसाठी ही सुविधा दिलासादायक ठरणार आहे.

कोकणातील गणेशोत्सवाची परंपरा ही केवळ धार्मिक उत्सवापुरती मर्यादित नसून ती भावनिक नात्यांची जपणूक करणारी परंपरा आहे. वर्षभर शहरांमध्ये धावपळ करणारा चाकरमानी गणपतीच्या निमित्ताने आपल्या घराच्या उंबरठ्यावर पोहोचतो. त्यामुळे गावी जाण्याचा प्रवास हा प्रत्येक कोकणवासीयासाठी भावनिक असतो. या पार्श्वभूमीवर विशेष एसटी गाड्यांना मिळालेली मंजुरी ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून गणरायाच्या दर्शनासाठी आणि कुटुंबीयांसोबत सण साजरा करण्यासाठी आतुरलेल्या चाकरमान्यांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे.

नामदार भरत गोगावले यांच्या पाठपुराव्यामुळे महाड, माणगाव, पोलादपूर मार्गावरील प्रवाशांना गणेशोत्सवात अतिरिक्त वाहतूक सुविधा उपलब्ध होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. आगामी काळात प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन आणखी आवश्यक त्या फेऱ्या वाढविण्याची अपेक्षाही व्यक्त होत आहे.

# माणगावच्या आरोही मांडवकरचे प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उज्ज्वल यश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील श्री लक्ष्मी आर्टचे मालक विपुल मांडवकर यांची कन्या व लीड सीबीएसई स्कुल माणगावची विद्यार्थिनी.आरोही विपुल मांडवकर हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेत पुणे यांच्यामार्फत एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ४थी )मध्ये उज्वल यश मिळवले. रायगड जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत आरोही चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन तिने शिष्यवृत्ती पटकावली आहे.



आरोहीने प्राप्त केलेल्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

आपल्या या यशाबद्दल बोलताना आरोही म्हणाली की, माझ्या या यशामध्ये माझे आई-वडील तसेच मला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे शाळेचे सर्व शिक्षकवर्ग यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांच्या मार्गदर्शनामुळेच मी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झाल्याचे तिने सांगितले.

# महाड-पाने-वाघोली एसटीचा अपघात

## चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील पाणे वाघोली मार्गावर आज सकाळी एका एसटी बसचा अपघात झाला. चालकाच्या प्रसंगावधानामुळे याठिकाणी मोठा अनर्थ टळला आहे.

पाने गावातून ३५ ते ४० प्रवासी घेऊन निघालेली महाड आगाराची एसटी बस वाघोलीच्या दिशेने जात होती. या बसमध्ये शालेय विद्यार्थ्यांचाही समावेश होता. सकाळी बस वाघेरी गावच्या हद्दीतील वाघेरी पुलाजवळ आली असता समोरून एक दुचाकीस्वार भरधाव वेगात आला. दुचाकीला थेट धडक होऊ नये म्हणून चालकाने अचानक स्टेअरिंग वळवले.

यावेळी चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे रस्ता सोडून एसटी बस बाजूच्या घसरत गेली आणि काही फूट अंतरावर असलेल्या एका झाडाला जाऊन धडकली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# राष्ट्रीय पुस्तकप्रेमी दिनी 'रीडर्स ऑफ महाड' पुस्तक क्लब सुरू



**महाड : प्रतिनिधी**

पुस्तकांच्या माध्यमातून विचारशील, प्रश्न विचारणारी आणि कृतीशील पिढी घडवण्यासाठी तरुणांनी तरुणांसाठी सुरू केलेल्या "रीडर्स ऑफ महाड" या बुक क्लबची पहिली बैठक राष्ट्रीय पुस्तकप्रेमी दिन, ९ ऑगस्ट रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, सेमिनार हॉल, महाड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

SELF स्वयंसेवी संस्थेच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या क्लबचा उद्देश महाड आणि परिसरातील तरुण वाचनप्रेमी, लेखक, विद्यार्थी आणि विचारवंतांना एकाच व्यासपीठावर आणून संवादातून सामाजिक जाणीव निर्माण करणे हा आहे. अज्ञान, अंधश्रद्धा आणि उदासीनतेवर मात करून सुधारणावादी समाज घडवणे ही या चळवळीची भूमिका असल्याचे क्लबच्या प्रास्ताविकात मुक्ता मेहंदळे यांनी स्पष्ट केले.

पहिल्याच बैठकीला महाडमधील शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, तरुण लेखक, तरुण-तरुणी आणि ज्येष्ठ वाचकांनी हजेरी लावली. यावेळी बोलताना नितीन भालेराव म्हणाले, "पुस्तक हेच खरे ज्ञानाचे दार आहे. तरुणांनीच पुढाकार घेऊन सुरू केलेल्या 'रीडर्स ऑफ महाड' च्या माध्यमातून महाडमध्ये एक चिकित्सक, प्रश्न विचारणारी आणि सुसंस्कृत पिढी घडवण्याचे व्यासपीठ निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाला प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील ज्येष्ठ पत्रकार नितीन भालेराव आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड BARTI चे व्यवस्थापक प्रकाश जमदाडे यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी तरुणाईने पुढाकार घेतल्याबद्दल कौतुक केले आणि वाचनामुळे होणाऱ्या वैचारिक परिवर्तनावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्पिता देवळेकर यांनी केले. संयोजक परिक्षित चिमणकर यांनी आभार व्यक्त केले. महाडमधील सर्व वयोगटातील वाचनप्रेमींना कोणत्याही शुल्काशिवाय या क्लबमध्ये सहभागी होण्याचे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

# मैत्र जीवाचे युथ फाऊंडेशनचा ‘एक घर, एक वृक्ष’ उपक्रम उत्साहात



**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील मैत्र जीवाचे युथ फाऊंडेशनच्या माध्यमातून किल्ले रायगड परिसरातील चापगाव आणि रायगडवाडी येथे ‘एक घर, एक वृक्ष’ हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमासाठी प्रिव्ही स्पेशालिटी केमिकल्स कंपनीचे सहकार्य लाभले.

किल्ले रायगड परिसरातील विविध गावांतील तरुणांनी एकत्रित येत मैत्र जीवाचे युथ फाऊंडेशनची स्थापना केली आहे. ग्रामीण भागातील शैक्षणिक, सामाजिक तसेच कृषी विषयक विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून चापगाव आणि रायगडवाडी येथे ‘एक घर, एक वृक्ष’ अभियान राबविण्यात आले. प्रत्येक घराच्या परिसरात वृक्ष लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश यावेळी देण्यात आला.

या उपक्रमावेळी सामाजिक कार्यकर्ते रवींद्र तरडे, सरपंच शशिकांत मोरे, ग्रामपंचायत सदस्य वैष्णवी विजय सणस, सदस्य सुमन मोरे, संपत मोरे, सचिन धोत्रे, प्रभाकर सावंत, विजय कोळसकर, संस्थेचे अध्यक्ष नीलेश पवार, सचिव संदीप आमगावकर, सदस्य शैलेश शिर्के, विजय सणस, माया कोर्पे, दगडू आमगावकर, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षलागवडीसोबतच लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

# तटकरे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे दि.१२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन विस्तार विभागाच्या वतीने ‘युवाशक्ती परिवर्तनाची दिशा’ या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड राजीव साबळे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. आर. पांडेय यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माणगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर तसेच माणगाव पोलीस ठाण्याच्या उपनिरीक्षक पूजा वराडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीपूजनाने करण्यात आली. प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. संगीता उतेकर यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना संजय बांगर आणि पूजा वराडे यांनी युवा पिढीने शिक्षणासोबतच सामाजिक जबाबदारी, शिस्त, कायद्याचे भान आणि सकारात्मक विचारसरणी जोपासण्याची गरज व्यक्त केली. युवकांच्या ऊर्जेला योग्य दिशा मिळाल्यास समाज आणि राष्ट्राच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजेंद्र आचार्य यांनी युवक हे देशाचे भविष्य असून, त्यांच्या कल्पकता, ऊर्जा आणि कौशल्यांचा विधायक कार्यासाठी उपयोग होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील आजीवन अध्ययन विस्तार विभाग प्रमुख डॉ. संगिता उतेकर,प्रा.अंकिता म्हस्के, प्रा. वृषाली सालस्कर ,प्रा.अश्विनी शेलार,प्रा.मंजिरी सावंत,प्रा.तेजस्विनी आचार्य,प्रा.मितेश मनवल तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्री स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

शालोम एज्युकेशन सेंटर संचालित मतिमंद मुलांची शाळा, खोपोली येथील दिव्यांग विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून व मेहनतीतून तयार केलेल्या विविध वस्तूंच्या विक्रीसाठी सह्याद्री विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, शिळफाटा येथे विशेष स्टॉल उभारण्यात आला होता. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शाळेत अठरा वर्षांखालील एकूण २३ दिव्यांग विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व कौशल्यांना चालना मिळावी, यासाठी त्यांच्याकडून विविध आकर्षक व नाविन्यपूर्ण वस्तू तयार करून घेतल्या जातात. याच वस्तूंच्या विक्रीचा स्टॉल सह्याद्री विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, शिळफाटा येथे लावण्यात आला होता.

या स्टॉलमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध प्रकारच्या राख्या, सुगंधी साबण, अगरबत्त्या, जास्वंदी, चाफा व गुलाबाची कृत्रिम फुले, प्लास्टिक व कागदापासून तयार केलेल्या सजावटीच्या वस्तू तसेच अनेक शोभिवंत वस्तू विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी अत्यंत बारकाईने व कलात्मक पद्धतीने तयार केलेल्या या वस्तूंना भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठी पसंती दर्शवून उत्स्फूर्तपणे खरेदी केली.



सह्याद्री विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, शिळफाटा येथील शाळा समिती अध्यक्ष संजय पाटील व मुख्याध्यापक दिलीप मोरे यांनी स्टॉलला भेट देऊन दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे कौतुक केले. या वस्तू अत्यंत नाविन्यपूर्ण, आकर्षक व कल्पकतेने तयार करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देत शाळा समिती अध्यक्ष संजय पाटील व मुख्याध्यापक मोरे सर यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेसाठी आर्थिक मदत केली.

कार्यक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल मतिमंद मुलांची शाळेच्या मुख्याध्यापिका शुभा पाटणकर यांनी सह्याद्री विद्यालय,कनिष्ठ महाविद्यालय व सह्याद्री इंग्लिश स्कूल शिळफाटा येथील शाळा समिती अध्यक्ष संजय पाटील, मुख्याध्यापक दिलीप मोरे सर, लेखनिक विनित जाधव,शिक्षक, विद्यार्थी व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम त्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी देणारा ठरला.

# दीप अमावास्येनिमित्ताने श्री संत बाळूमामा मंदिरात रक्तदान शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

लोणावळा पांगोळी (धनगरवस्ती) येथे असलेल्या श्रीसंत बाळूमामा मंदिरात आज दिप अमावास्या निमित्ताने सकाळ पासून हजारो भाविक भक्तांनी उपस्थित राहून मामांचे दर्शन घेतले, श्रीसंत बाळू मामा देवस्थानच्या ट्रस्टच्या सहकार्याने आणि अक्षय ब्लड बँक सातारा यांच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते तर यावेळी अनेक तरुणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी लोणावळा पांगोळी धनगरवस्ती येथे श्रीसंत बाळू मामा देवाचे भव्य मंदिर गेल्या अनेक वर्षांपासून आहे ,या मंदिरात श्रीसंत बाळू मामांचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्त दररोज मोठ्या संख्येने येत असतात,या मंदिरात दर अमावस्या ला मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याचा महाप्रसाद असतो, त्यातच आज गटारी अमावास्या असल्याने या मंदिरात सकाळ पासून हजारो भाविक भक्त उपस्थित राहून श्रीसंत बाळू मामांचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला,

आज अक्षय ब्लड बँक सातारा यांच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते यावेळी ७८ पेक्षा जास्त तरुणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

या सर्व भाविक भक्तांची यथोचित सोय श्रीसंत बाळू मामा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी आदर्श सरपंच बबन खरात यांच्यासह ग्रामस्थांनी करीत असतात.यावेळी सातारा येथील अक्षय ब्लड बँकचे अनिकेत मेळाट, धनुराज ढोणे, प्रतीक सोनवणे, आकाश उमापे, ऋषीं मेळाट, निनाद सुरगुडे, अनमोल अरगडे,आदिनी मेहनत घेतली.



# श्रीलंकेविरुद्ध कसोटीत कुणाला मिळणार संधी?

## प्लेईंग ११मध्ये स्थान मिळवण्यासाठी टीम इंडियात चुरस



**गॉल : वृत्तसंस्था**

भारतीय संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेतील पहिला कसोटी सामना १५ ऑगस्टपासून गॉलच्या मैदानावर खेळवला जाईल. या मालिकेत जसप्रीत बुमराह आणि साई सुदर्शनसारखे स्टार खेळाडू दुखापतग्रस्त असल्यामुळे खेळताना दिसून येणार नाहीत. त्यामुळे प्लेईंग ११मध्ये कोणाला संधी द्यायची असा प्रश्न कर्णधार शुबमन गिलसमोर असणार आहे.

श्रीलंकेत फिरकी गोलंदाजांना चांगलीच मदत मिळते. त्यामुळे प्लेईंग ११मध्ये अष्टपैलू आणि नवख्या खेळाडूंना संधी दिली जाऊ शकते. या सामन्यात सारांश जैनला पदार्पण करण्याची संधी दिली जाऊ शकते, तर मानव सुथार आणि रवींद्र जडेजा हे तिन्ही फिरकी गोलंदाज प्लेईंग ११चा भाग असू शकतात.

यासह वेगवान गोलंदाज म्हणून मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णा या दोघांना संधी दिली जाऊ शकते. सारांश जैन, रवींद्र जडेजा आणि मानव सुथार या फिरकी गोलंदाजांना साथ देण्यासाठी अनुभवी फिरकी गोलंदाज कुलदीप यादवचादेखील प्लेईंग ११मध्ये समावेश केला जाऊ शकतो.

यष्टिरक्षक फलंदाज म्हणून भारतासमोर ऋषभ पंत आणि ध्रुव जुरेल असे दोन पर्याय आहेत. पंत सराव सामन्यात हवी तशी कामगिरी करू शकला नव्हता, पण अनुभव पाहता त्याला प्लेईंग ११मध्ये संधी दिली जाऊ शकते. यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल ही जोडी डावाची सुरुवात करताना दिसेल. साई सुदर्शनच्या जागी देवदत्त पडिक्कलला संधी दिली जाऊ शकते, तर कर्णधार शुबमन गिल चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना दिसेल.

# अफगाणिस्तानच्या युवा खेळाडूचे विक्रमी शतक

**बेलाफास्ट** : अफगाणिस्तानने पाच सामन्यांच्या मालिकेतील चौथ्या एकदिवसीय सामन्यात आयर्लंडवर दमदार विजय मिळवला. या विजयासह अफगाणिस्तानने अजून एक सामना बाकी असताना मालिकेत ३-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. या विजयाचा प्रमुख शिल्पकार ठरला सलामीवीर सिदीकुल्लाह अटल. यासह मोठा विक्रम त्याने नावे केला.



सेदिकुल्लाह अटलने या सामन्यात तुफानी फलंदाजी करत १२० चेंडूत १४३ धावांची विक्रमी खेळी साकारली. त्याच्या या खेळीत १७ चौकार आणि चा षटकारांचा समावेश होता. विशेष म्हणजे, ही ऐतिहासिक खेळी त्याने त्याच्या २५व्या वाढदिवशी खेळली. वनडेमध्ये वाढदिवशी सर्वाधिक वैयक्तिक धावा करण्याचा विक्रम आता त्याच्या नावावर झाला आहे. यापूर्वी हा विक्रम न्यूझीलंडचा टॉम लॅथम याच्या नावावर होता. लॅथमने २०२२मध्ये आपल्या ३०व्या वाढदिवशी नेदरलँड्सविरुद्ध १४० धावांची खेळी केली होती.

# उरणच्या प्रियांशी पाटीलने विंडसर्फिंगमध्ये रचला इतिहास

## 'डबल एशियन मेडलिस्ट' ठरणारी राज्यातील पहिलीच खेळाडू

**उरण : वार्ताहर**

जिद्द आणि चिकाटी असेल तर महागड्या प्रशिक्षणाची गरज नसते हे उरणच्या एका १४ वर्षीय मुलीने दाखवून दिले आहे. आर्थिक व भौगोलिक आव्हानांवर मात करत प्रियांशी मयूर पाटील हिने आंतरराष्ट्रीय विंडसर्फिंग क्षेत्रात भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे.



नुकत्याच ४ ते ८ ऑगस्टदरम्यान मलेशिया येथे पार पडलेल्या एशियन चॅम्पियनशिपमध्ये प्रियांशीने कांस्यपदक जिंकले. या कामगिरीसह प्रियांशी ही सलग दोन वर्षे (२०२५ आणि २०२६) 'डबल एशियन मेडलिस्ट' ठरणारी महाराष्ट्रातील सर्वात कमी वयाची पहिली आणि एकमेव मुलगी ठरली आहे.

प्रियांशी सध्या उरण बोरी येथील रोटरी इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये इयत्ता नववीत शिकते. तिचे वडील मयूर अशोक पाटील हे भारतीय नौदलात कार्यरत असून आई रुचिका पाटील यांनी घरची आघाडी सांभाळत प्रियांशीच्या स्वप्नांना पंख दिले. समुद्राच्या लाटांशी लढा देण्याचे बाळकडू प्रियांशीला वडिलांकडूनच मिळाले आहे. तिचे वडील स्वतः एक उत्कृष्ट जलतरणपटू आहेत.

प्रियांशीने याचिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडून खेळताना थेट जागतिक पातळीवर घेतलेली झेप थक्क करणारी आहे. २०२५ ते २६ या चालू वर्षाच्या हंगामात प्रियांशीने तब्बल १५ विंडसर्फिंग चॅम्पियनशिप गाजवल्या आहेत. 'टेक्नो २९३'च्या १५ आणि १७ वर्षाखालील मुलींमध्ये एक अत्यंत आव्हानात्मक गटात खेळताना तिने भारताच्या झोळीत एकूण १५ पदके टाकली. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये एकापाठोपाठ एक पराक्रम गाजवत प्रियांशीने जागतिक क्रीडा नकाशावर उरणचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले आहे. या ऐतिहासिक तिच्यासह पालकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### वडिलांचे भक्कम पाठबळ

आजच्या काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी खेळाडू लाखो रुपये खर्च करून विशेष कोचिंग क्लासेस लावतात, परंतु प्रियांशीला असा कोणताही व्यावसायिक किंवा महागडा कोचिंग क्लास लावलेला नाही. विंडसर्फिंग सारख्या कठीण खेळाचे कोणते विशेष मार्गदर्शन उपलब्ध नसताना वडील मयूर पाटील प्रियांशीला विविध स्पर्धांसाठी घेऊन जातात आणि तिचा सराव करून घेतात. प्रियांशी जेव्हा प्रत्यक्षात मुख्य स्पर्धेच्या ठिकाणी जाते तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या मार्गदर्शकांकडून ती आवश्यक ती तांत्रिक माहिती घेते आणि आपल्या कौशल्याची कसब दाखवते.


# पीएसजीने दुसऱ्यांदा सुपर कप जिंकला

**साल्झबर्ग : वृत्तसंस्था**

पॅरिस सेंट-जर्मनने अॅस्टन व्हिलावर २-१ असा रोमांचक विजय मिळवत २०२६ यूईएफए सुपर कप आपल्या नावावर केला. ऑस्ट्रियातील साल्झबर्ग येथे झालेल्या या सामन्यात पीएसजीने पिछाडीवरून आलेल्या अॅस्टन व्हिलाला अखेरपर्यंत रोखत विजेतेपद पटकावले. या विजयासह त्यांनी सलग दुसऱ्या वर्षी सुपर कप जिंकला.

या सामन्यात युरोपातील दोन प्रमुख क्लब स्पर्धांच्या विजेत्यांमध्ये थेट सामना पाहायला मिळाला. २०व्या मिनिटाला ख्विचा क्वारत्सखेलियाने पीएसजीला आघाडी मिळवून दिली. डेझिरे डोएच्या पासवर चेंडू मिळाल्यानंतर क्वारत्सखेलियाने आतमध्ये कट करत जोरदार फटका मारला आणि अॅस्टॉन विलाचा गोलरक्षक मार्को बिझॉटला कोणतीही संधी दिली नाही.

पहिल्या हाफच्या शेवटीस अॅस्टन व्हिलाने जोरदार पुनरागमन केले. १७ वर्षीय ब्रायन मॅडजो याने जॉन मॅक्झिनच्या क्रॉसीवर अप्रतिम व्हॉली मारत गोल केला आणि सामना १-१ असा बरोबरीत आणला. या गोलसह मॅडजोने यूईएफए सुपर कपच्या इतिहासात सर्वात कमी वयाचा गोल होण्याचा विक्रम केला. तो १७ वर्षे २१२ दिवसांचा होता. यापूर्वी हा विक्रम पॅट्रिक क्लुइव्हर्ट यांच्या नावावर होता.



दुसऱ्या हाफमध्ये अॅस्टन व्हिलाने सुरुवातीला पीएसजीवर दबाव निर्माण केला, मात्र ६१व्या मिनिटाला पीएसजीने पुन्हा आघाडी घेतली. औसेमेन डेम्बेलेने दिलेल्या अचूक थ्रू-बॉलवर डेझिरे डोएने धावत जाऊन गोलरक्षकाला चकवत चेंडू दूरच्या कोपऱ्यात पाठवला. सुरुवातीला ऑफसाइडचा झेंडा उचलण्यात आला होता, मात्र व्हीएआर तपासणीनंतर गोल वैध ठरवण्यात आला. यानंतर अॅस्टन व्हिलाने बरोबरी साधण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, मात्र पीएसजीच्या बचावफळीने अखेरपर्यंत संयमी खेळ करत सामना २-१ असा आपल्या बाजूने ठेवला. डोएला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

### ऐतिहासिक विक्रम

पीएसजीने याआधी २०२५मध्ये त्यांनी टोटेनहॅम हॉटस्परला पेनल्टी शूटआऊटमध्ये हरवत हा किताब जिंकला होता. सलग दोन सुपर कप जिंकणारा पीएसजी हा इतिहासातील केवळ तिसरा क्लब ठरला आहे. यापूर्वी एसी मिलान (१९८९, १९९०) आणि रिअल माद्रिद (२०१६, २०१७) यांनी ही कामगिरी केली होती. पीएसजीचे प्रशिक्षक लुईस इन्रिक यांनी आपल्या कारकिर्दीतील तिसरा सुपर कप जिंकला. यापूर्वी त्यांनी बर्सिलोनासोबत २०१५मध्ये आणि पीएसजीसोबत २०२५मध्ये हा किताब जिंकला होता.

# भारत-श्रीलंका कसोटीत अजिंक्य रहाणे करणार 'बोलंदाजी'

### कॉमेंट्रीसाठी सज्ज

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा माजी कसोटीपटू आणि कार्यवाहू कर्णधार म्हणून खास छाप सोडणाऱ्या अजिंक्य रहाणेसाठी भारत-श्रीलंका यांच्यातील कसोटी मालिका खास ठरणार आहे, कारण या मालिकेतून तो आपल्या नव्या इनिंगची सुरुवात करण्यासाठी सज्ज झाला आहे. भारतीय क्रिकेटमध्ये अविस्मरणीय योगदान देणारा अजिंक्य आता सोनी स्पोर्ट्स नेटवर्क आणि सोनी लाईव्हवर कसोटी कॉमेंट्रीमध्ये पदार्पण करणार आहे.



काही दिवसांपूर्वीच रहाणेने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांतून निवृत्तीची घोषणा केली. त्यानंतर आता भारत-श्रीलंका यांच्यात १५ ते २७ ऑगस्टदरम्यान खेळल्या जाणाऱ्या कसोटी मालिकेत हा दिग्गज मुंबईकर आपल्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि लाल चेंडूच्या क्रिकेटमधील सखोल ज्ञानाचा उपयोग कॉमेंट्री बॉक्समधून करणार आहे. सामन्यातील रणनीती, महत्त्वाचे क्षण आणि खेळातील बारकावे याबाबत माहिती देत तो चाहत्यांची टेस्ट क्रिकेटशी गोडी आणखी वाढवणार आहे.

**नव्या भूमिकेसाठी उत्सुक**

भारताच्या श्रीलंका दौऱ्यात सोनी स्पोर्ट्स नेटवर्क आणि सोनी लाईव्हसाठी कसोटी कॉमेंट्रीमध्ये पदार्पण करण्यास उत्सुक आहे, असे रहाणेने म्हटले आहे. कसोटी हा क्रिकेटमधील सर्वोच्च प्रकार असून अनेक वर्षे भारताचे प्रतिनिधित्व केल्यानंतर आता वेगळ्या दृष्टिकोनातून हा खेळ पाहण्याची संधी मिळत असल्याचा आनंद त्याने व्यक्त केला.

# आयसीसी क्रमवारीत टीम इंडियाचे वर्चस्व



**दुबई : वृत्तसंस्था**

### तीन प्रकारांत चार भारतीय 'नंबर वन'

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केलेल्या ताज्या कसोटी क्रमवारीत जसप्रीत बुमराह अव्वल स्थानावर कायम आहे. कसोटीतील अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत रवींद्र जडेजाचा जलवा पाहायला मिळतो. मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये वनडे आणि टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत शुभमन गिल आणि ईशान किशन अव्वल स्थानावर आहेत. त्यामुळे तिन्ही फॉरमॅटमध्ये टीम इंडियाचा दरारा दिसून येतो.

कसोटी क्रमवारीत पाकिस्तानच्या तीन खेळाडूंना मोठा फायदा झाला आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दमदार कामगिरीच्या जोरावर पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमने पाच स्थानांची झेप घेत थेट दहाव्या क्रमांकावर प्रवेश केला आहे. जवळपास दोन वर्षांनंतर बाबरने कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत टॉप-१०मध्ये एन्ट्री मारली आहे.

पाकिस्तानच्याच अब्दुल्ला शफीकने तब्बल २५ स्थानांची झेप घेत ३२व्या क्रमांकावर प्रवेश केला, तर फिरकीपटू साजिद खानने पाच स्थानांची सुधारणा करत ३०वे स्थान पटकावले आहे. याव्यतिरिक्त अफगाणिस्तानचा सलामीवीर रहमानुल्लाह गुरबाज तीन स्थानांच्या सुधारणेसह ११व्या क्रमांकावर पोहोचला आहे. हशमतुल्लाह शाहिदी चार स्थानांनी वर चढून ५०व्या क्रमांकावर आला, तर वनडे गोलंदाजांच्या क्रमवारीत अफगाणिस्तानचा कर्णधार राशिद खान अव्वल स्थानावर कायम आहे.

# मैदानावर अचानक पसरला काळोख

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या द हंड्रेड लीग स्पर्धेदरम्यान चाहत्यांसह क्रिकेटपटूही सूर्यग्रहणाचा अद्भुत नजारा पाहताना दिसून आले. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.



द हंड्रेड लीग स्पर्धेत एका सामन्यात एमआय लंडन आणि बर्मिंघम फिनिक्स हे दोन्ही संघ आमने सामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावातील ६० चेंडूंचा खेळ पूर्ण होताच अचानक काळोख पसरला. दिवसाढवळ्या अंधार पडल्याने सर्वांच्या नजरा वर आकाशाकडे गेल्या. काही वेळापूर्वी प्रकाशमय असलेला सूर्य अचानक चंद्रासारखा भासू लागला. सूर्याला आपण असे उघड्या डोळ्याने व्यवस्थित पाहू शकत नाही. त्यामुळे चाहत्यांनी काळ्या रंगाचा चष्मा लावून हे सूर्यग्रहण पाहिले.

मैदानात सामना पाहण्यासाठी आलेल्या क्रिकेट चाहत्यांसह क्रिकेट खेळत असलेले खेळाडू देखील हा अद्भुत नजारा पाहताना दिसून आले. त्यामुळे सामना काही मिनिटांसाठी थांबवण्यात आला होता. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

# मिचेल स्टार्कचा वर्ल्ड रेकॉर्ड

## कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी घेणारा डावखुरा गोलंदाज

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा उत्कृष्ट गोलंदाज मिचेल स्टार्कने एक नवा विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे. पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा संघ सर्वबाद झाल्यानंतर बांगलादेशचा संघ फलंदाजीसाठी उतरला आणि मिचेल स्टार्कने संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिली. या विकेटसह स्टार्कने कसोटी इतिहासात मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे



बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु पहिल्या दिवसाच्या तिसऱ्या सत्रातच संपूर्ण संघ १९८ धावांवर सर्वबाद झाला. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघ पहिल्यांदाच २०० धावांच्या आत सर्वबाद झाला.

सलामीवीर शादमान इस्लाम आणि तन्झिद हसन तमीम यांनी बांगलादेश संघाला स्थिर सुरुवात करून देण्याचा प्रयत्न केला, पण मिचेल स्टार्कने नवव्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर शादमान इस्लामला झेलबाद केले. यासह स्टार्कने कसोटी क्रिकेटमध्ये ४३४ बळींचा टप्पा गाठला.

मिचेल स्टार्कने ऑस्ट्रेलियाला ब्रेकथ्रू मिळवून दिल्यानंतर कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक बळी घेणारा 'डावखुरा गोलंदाज' ठरला. विशेष म्हणजे, त्याने हा टप्पा 'आंतरराष्ट्रीय डाव्या हाताचे व्यक्ती दिन' या खास दिवशी गाठला आहे. याशिवाय, कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी घेण्याच्या बाबतीत स्टार्कने आता भारताचे दिग्गज खेळाडू कपिल देव यांच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध बांगलादेशच्या हसन महमूदचा कहर

## ५५ धावांत सहा विकेट्स!



**डार्विन : वृत्तसंस्था**

डार्विनच्या मारारा स्टेडियमवर ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना खेळवण्यात येत आहे. २६ वर्षांनी ऑस्ट्रेलियन मैदानात उतरलेल्या बांगलादेश संघाने २६ वर्षीय जलदगती गोलंदाज हसन महमूदच्या भेदक माऱ्याच्या जोरावर घरच्या मैदानावर खेळणाऱ्या 'कांगारू'चा पहिला डाव अवघ्या १९८ धावांत आटोपला.

ऑस्ट्रेलियाच्या डावातील १२व्या षटकात हसन महमूद याने सलामीवीर जेक वेदरल्डच्या रूपात बांगलादेशला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर १४व्या षटकातील चौथ्या चेंडूवर महमूदने ट्रॅव्हिस हेडला बोल्ड करत ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का दिला. त्याने ३९ चेंडूत तीन चौकारांच्या मदतीने २२ धावा केल्या.

इबादत हुसेन याने मार्नस लाबुशेनला अवघ्या एका धावेवर चालते केल्यावर तस्कीन अहमदने कॅमरून ग्रीनला १३ धावांवर तंबूचा रस्ता दाखवत लंचआधी ऑस्ट्रेलियाची अवस्था ४ बाद ७४ धावा अशी बिकट केली. ४५ धावांवर पहिली विकेट गमावलेल्या ऑस्ट्रेलियाने अवघ्या २९ धावांत चार विकेट्स गमावल्या. आघाडीच्या फलंदाजांच्या फ्लॉप शोनंतर स्टीव्ह स्मिथने १०९ चेंडूत ७१ धावांची खेळी केली. अन्य कोणत्याही फलंदाजाला मैदानात तग धरता आला नाही. बांगलादेशकडून हसन महमूद याने ५५ धावांत सहा विकेट्स घेत ऑस्ट्रेलियाचे कंबरडे मोडले.



# तायक्वांदोमध्ये प्रित प्रबळकरला रौप्यपदक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सिंहगड इंटरनॅशनल स्कूल, मुंबई येथे पार पडलेल्या स्पर्धेत झोनल तायक्वांदो स्पर्धेत लोधिवली येथील सेंट जोसेफ स्कूलमधील विद्यार्थी प्रित योगेश प्रबळकर याने रौप्यपदक पटकावले आहे.

या स्पर्धेत राज्यभरातील सीआयएससीई शाळांमधील खेळाडू सहभागी झाले होते. यामध्ये प्रितने कांस्यपदक जिंकले. त्याला प्रशिक्षक सचिन माळी आणि शालेय शिक्षक आदित्य यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या प्राचार्य आणि सर्व शिक्षकांनी प्रितचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# गांगुलीवर बनवला होता प्रँक; हरभजनचा खुलासा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हरभजन सिंग, सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड, वीरेंद्र सेहवाग हे व असे अनेक खेळाडू दादाच्या उर्फ सौरव गांगुलीच्या नेतृत्वाखाली खेळले आहेत. नुकत्याच एका मुलाखतीत हरभजन सिंगने सौरव गांगुलीने मोठ्या भावाप्रमाणे सर्व खेळाडूंना समजून घेत सांभाळत संघाला कसं पुढे नेलं, याचा उल्लेख केला. यादरम्यान गांगुलीबरोबर केलेल्या प्रँकबद्दलदेखील त्याने सांगितलं.



हरभजनने म्हणाला, एकदा संपूर्ण संघ एकत्र बसला होता. मी आणि युवराजने दादावर एप्रिल फूलचा प्रँक करण्याचा प्लॅन केला. आम्ही एक बनावट वर्तमानपत्राची कात्रण तयार केली, ज्यातून दादाने कधीच न बोललेलं विधान केल्यासारखं दिसत होतं. त्यामध्ये दादाने म्हटलं होतं की युवी पार्टी करण्यात व्यस्त असतो, हरभजनला कोणाची काही पडली नाहीये. आशिष नेहरा आपल्याच जगात असतो. झहीर खानपण पार्टी करत असतो., दादा म्हणाला मी असं कुठे म्हणालो. युवराज त्याला प्रश्न विचारू लागला. काही वरिष्ठ खेळाडूंनाही आम्ही या प्रँकमध्ये सहभागी केलं होतं. मी म्हणालो, 'पाजी, तुम्हीच सांगा, दादा जर खरंच असं बोलला असेल तर ते चुकीचं आहे.' राहुल द्रविडनेही अप्रतिम अभिनय करत म्हटलं, 'दादा, हे योग्य नाही.

हरभजन किस्सा रंगवत पुढे सांगितलं, "दोन्ही वरिष्ठ खेळाडूंनी प्रश्न विचारल्यावर दादा म्हणाला, 'मी शपथ घेतो, मी असं काही बोललो नाही. जर बोललो असेन तर मी कर्णधारपद सोडेन.' दादा सतत विचारत होता, 'हे कुठे छापलं आहे?' अर्थात, हे सगळं आम्हीच बनवलं होतं. त्यावेळी आमच्यापैकी एक दोन जण बॅग घेऊन निघत होते. दादा अक्षरशः आमच्यामागे हात जोडत आला की अरे उद्या मॅच आहे तुम्ही काय करताय.

प्रँक उघड झाल्यानंतरचा प्रसंग आठवत तो म्हणाला, दादाकडे पाहून मग वाटलं, अरे आपण उगीच असा प्रँक केला. दुसरा कुणी असता तर कदाचित रागावला असता आणि म्हणाला असता बॅगा घेऊन निघा, पण दादा आमच्यासाठी मोठ्या भावासारखा होता. तो मनाने खूप चांगला माणूस होता आणि त्याच्यामुळे ड्रेसिंग रूमचं वातावरण इतकं छान होतं की आम्ही नेहमी एकत्र असायचो.

### ड्रेसिंग रूममध्ये कुटुंबासारखे वातावरण

यावेळी हरभजनने भावूक होत सांगितले की, संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये कुटुंबासारखं वातावरण होतं आणि त्या वातावरणातून मी खूप काही शिकलो. सचिन तेंडुलकर, दादा, राहुल द्रविड, अनिल कुंबळे यांसारखे महान खेळाडू आमच्यासोबत होते. अनिलभाऊ, व्हीव्हीएस लक्ष्मण आणि जवागल श्रीनाथ यांनीही तरुण खेळाडूंची विशेष काळजी घेतली. क्रिकेट असो किंवा कोणताही खेळ, ड्रेसिंग रूम कायम गंभीर नसावा. तिथे मजा, हसू आणि आनंदही असायला हवा. आनंदी ड्रेसिंग रूम ही जिंकणारी ड्रेसिंग रूम असते. एकमेकांसोबत तुम्ही जितके आनंदी असता, तितकी मैदानावरची कामगिरी चांगली होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com